# संपादकीय

**ग्रंथव्यवहाराचे राजधानीतील केंद्र**

निरनिराळ्या शहरातील ग्रंथव्यवहाराचे नियंत्रण तेथील विशिष्ट भागातून होते, पुस्तकांची दुकाने त्या भागात अधिक प्रमाणात असतात; अनेक प्रकाशनसंस्थांची कार्यालये तेथे असतात. कुठलेही पुस्तक मिळवायचे असेल तर त्या भागाला भेट देणे हा सर्वात सुलभ मार्ग ठरतो. पुण्यात अप्पा बळवंत चौक, मुंबईत गिरगाव किंवा दादर, इंग्रजी पुस्तकांसाठी फोर्ट विभाग, कोल्हापूरला महाद्वार रोड भाऊसिंगजी रोड परिसर इ. भागांची नावे सहजपणे ग्रंथव्यवहाराची केंद्रे म्हणून लक्षात येतात. कलकत्ता येथील कॉलेज स्ट्रीटवर पुस्तकांची दुकानेच दुकाने एकापुढे एक अशी आहेत; आणि फूटपाथवरही जुन्या नव्या पुस्तकांचे स्टॉल्स आहेत. अनेक दुर्मिळ पुस्तके तेथे सहजपणे उपलब्ध होतात; आणि स्टॉलवरील विक्रेतेही अत्यंत जाणकार असतात; हवे ते पुस्तक मिळवून देतात असा आमचा अनुभव आहे.

दिल्लीतील दर्यागंज भागातील अन्सारी रोड हे देखील ग्रंथव्यवहाराचे मुख्य केंद्र आहे. हिंदीतील बहुतेक नामवंत प्रकाशनसंस्थांची कार्यालये व पुस्तक विक्री केंद्रे तेथे आहेत; आणि आता इंग्रजी प्रकाशनक्षेत्रातील अग्रगण्य संस्थाही अन्सारी रोडवर आपली कार्यालये थाटण्याच्या खटपटीत आहेत. ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसच्या एका ज्येष्ठ अधिकाऱ्याने याचे कारण देताना म्हटले होते, "कुठल्याही पुस्तकाचे नशीब या रस्त्यावर ठरते; आणि तेही एकदोन तासांमध्ये. अन्सारी रोडच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत पुस्तक फिरवले गेले की त्यावरील ज्या प्रतिक्रिया ऐकायला मिळतात, त्यावर त्या पुस्तकाला पुढे कसा प्रतिसाद मिळणार याचा बराचसा अंदाज येतो.'' रूपा आणि कंपनी या मातबर प्रकाशन संस्थेचे संचालक मेहरा हे "अन्सारी रोड म्हणजे इंक कॅपिटल - शाईची राजधानी'' - असे अभिमानाने सांगतात. अन्सारी रोडवरून काही प्रकाशकांनी आपली विक्रीकेंद्रे हलवून इतर भागात सुरू केली. त्यापैकी काही जणांना पुन्हा अन्सारी रोडवर येणे भाग पडले. तसेच आंतरराष्ट्रीय प्रकाशनसंस्थांनाही अन्सारी रोड हाच सर्वात जास्त सोयीचा वाटतो. कारण प्रकाशन-विक्री क्षेत्राशी संबंधित सर्व महत्त्वाच्या संस्था या भागात असल्याने एकमेकांशी संपर्क साधणे सोपे जाते. युनायटेड बुक्स, विकास, रूपा, बटरवर्थ, केंब्रिज युनिव्हर्सिटी प्रेस, वाणी प्रकाशन, राधाकृष्ण प्रकाशन,




अशा कितीतरी प्रकाशन संस्थांचा कारभार याच भागातून चालतो. लंडनच्या ब्लूम्सबरी भागाशी याची तुलना केली जाते. कारण ब्लूम्सबरी हेही इंग्लडमधील प्रमुख प्रकाशनसंस्थांचे मुख्य केंद्र आहे. कथाकादंबऱ्या, विज्ञानविषयक, पुस्तके, वैद्यकीय पुस्तके, पॉकेटबुक्स, धार्मिक पुस्तके अन्सारी रोडवरच्या प्रकाशकांच्या यादीत असतात; आणि त्यामुळे या भागात आले की आपली पुस्तकांची खरेदी सहजपणे होऊ शकते असा ग्राहकांचाही अनुभव आहे. मात्र कॉलेजेस, विद्यापीठे, संस्था यांची खरेदी येथे मोठ्या प्रमाणावर होते. त्यामानाने वैयक्तिक ग्राहक कमी येतात असेही दिसते.

लेखकांच्या दृष्टीनेही या भागाला तर तीर्थक्षेत्रासारखे मानाचे स्थान आहे. येथील एखाद्या प्रकाशनसंस्थेने एखाद्या लेखकाचे पुस्तक स्वीकारले म्हणजे त्याचे भाग्य फळफळते. आपली लेक सुस्थळी पडावी ही प्रत्येक आईची भावना असते, त्याचप्रमाणे आपले पुस्तक नामांकित प्रकाशनसंस्थेकडून प्रसिद्ध व्हावे अशी प्रत्येक लेखकाची इच्छा असते. या भागात आले की पुन्हा निवडीलाही वाव मिळतो. एखाद्या प्रकाशकाने असमर्थता दाखवली तर शेजारच्या दुसऱ्याकडे जाता येते. त्यामुळे कुठेतरी होकार मिळून जातो. आणि आपण नाही म्हटले तर शेजारचा आपला प्रतिस्पर्धी टपून बसलेला आहे याची जाणीव असल्याने चांगले पुस्तक दिसले तर कोणी ते सहसा हातचे जाऊ देत नाही. नवीन लेखकाला मानधन वगैरे कमी दिले तरी चालते; पण चांगला प्रकाशक हवा असतो हे मानसशास्त्रही येथे सर्वांना अवगत असते.

अन्सारी रोडवर आपले कार्यालय हवेच अशी निकड आता सर्वच प्रकाशकांना जाणवू लागल्याने सोयीची जागा मिळणे अवघड झाले आहे. त्यामुळे अगदी छोटे संपर्क कार्यालय येथे ठेवून, गोडाऊन व विक्रीकेंद्र अन्यत्र ठेवण्याचा मार्गही सरसहा पत्करला जात आहे. या भागाला लागूनच चांदनी चौक आणि जामा मसजिद भाग आहे. तेथे बहुतेक बाइंडर्सचे पुस्तक बांधणीचे काम चालते. अनेक बाइंडर्स पिढ्यानुपिढ्या या व्यवसायात आहेत. अन्सारी रोडची दिल्लीतल्या ग्रंथव्यवहारावर मोठी पकड आहे. या व्यवसायातील सर्वजण येथे एकमेकांना सहजपणे भटत असतात; प्रत्येकाला प्रत्येकजण ओळखून असतो. वसुली असो वा विक्री, झटपट काम होऊ शकते. ग्रंथ प्रकाशक महासंघाचे कार्यालय त्यामुळे याच रस्त्यावर असणे हे स्वाभाविक आहे. येथील या महासंघाचे पदाधिकारी अटीतटीने निवडणुका लढवतात आणि एकेका पार्टीवर काही लाखांचा खर्च सहजपणे करू शकतात. दिल्ली ग्रंथजत्रा किंवा विश्व पुस्तकजत्रा या प्रसंगी तर या पदाधिकाऱ्यांचा थाट

बघण्यासारखा असतो. भारतातील ग्रंथव्यवहाराचे नेत्रदीपक वैभवशाली दर्शन या जत्रांच्या वेळी घडते; आणि आपण ग्रंथव्यवहाराशी संबंधित आहोत याबद्दल आपल्यापैकी प्रत्येकाच्या मनात अभिमानाची लहर दौडून जाते. परदेशी प्रकाशन संस्थांच्या सहकार्याने भारतीय ग्रंथव्यवहारालाही आता आंतरराष्ट्रीय परिमाण प्राप्त होऊ लागले आहे. त्यामुळे दिल्ली ही भारताची राजकीय राजधानी आहे; त्याचप्रमाणे अन्सारी रोड ही भारताची ग्रंथव्यवहाराची राजधानी आहे असे म्हटले तर ती अतिशयोक्ती ठरू नये.



संपादक

## साहित्यप्रेमींची गप्पामंडळे

**जूनच्या अंकात आम्ही साहित्यप्रेमींची गप्पामंडळे गावोगाव असावी अशी कल्पना मांडली होती. तिला वाचकांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. ऑगस्ट अंकात सेलूच्या ग्रंथालयात चालू असणाऱ्या उपक्रमांवरील लेख दिला होता. इतर ठिकाणच्या रसिक ग्रंथप्रेमी वाचकांनीही अशा उपक्रमांची माहिती अवश्य पाठवावी.**

श्री. चंद्रसेन टिळेकर यांनी आचार्य अत्रे कट्टा पार्ले या गप्पामंडळाची माहिती पाठवली आहे.

१) कला, साहित्य, समाजकारण, इत्यादी कोणत्याही विषयावर मनमोकळ्या गप्पा मारण्यासाठी मुंबईमध्ये अडीच वर्षांपूर्वी आचार्य अत्रे कट्टा स्थापन झाला असून तो लोकप्रिय झाला आहे.

२) या कट्ट्यावर माधव गडकरी, डॉ. सुभाष भेंडे, बाळ सामंत, अशोक पाटोळे, शिरीष पै, राजा राजवाडे, रवींद्र पिंगे, दया पवार इत्यादी नामवंत साहित्यिकांनी सर्वसामान्याशी मनमोकळ्या गप्पा मारल्या आहेत.

३) केवळ साहित्यिकांसाठीच हा कट्टा सीमित नसल्याने मुंबईकरांनी ठिकठिकाणी असे कट्टे स्थापन केले आहेत. (आजमितीस सात ठिकाणी असे कट्टे आहेत. परिसरातील साहित्यिकांनी आपण होऊन तेथे जावे अशी अपेक्षा आहे.)

४) ठिकठिकाणच्या अत्रे कट्ट्यावर कथा, कविता, विडंबन काव्य, एकपात्री कार्यक्रम नवोदितांनी सादर करून एक प्रकारचा आत्मविश्वास मिळवला आहे.

५) केवळ नवोदितच नव्हे तर प्रभाकर पणशीकर, मंगला खाडिलकर, राजा मयेकर, संजय उपाध्ये इत्यादी नामवंत कलाकारांनीही आपल्या कलेचा आविष्कार कट्ट्यावर केला आहे.

६) ऑक्टोबर९८मध्ये पुण्यातही अत्रे कट्टा सुरू होत आहे. त्यानंतर प्रमुख शहरी ते स्थापन होणार आहेत.



# बाबा पाटील : एक समर्थ कथालेखक आणि निरपेक्ष स्नेह करणारा मित्र

काही लेखक मोजकेच लिहितात परंतु त्यांचे लेखन इतके कसदार असते की जाणकार रसिकांच्या मनाचा ते चटकन् वेध घेतात. बाबा पाटील हे असे एक सुंदर ग्रामीण कथा लिहिणारे लेखक होते. बाबा पाटील हे कोल्हापूरचे. त्यांच्या संस्कारक्षम वयात त्यांच्यावर भाऊसाहेब खांडेकरांचा प्रभाव होता. हा प्रभाव त्यांच्या जीवनावर सतत राहिला, पण साहित्यात मात्र बाबा पाटील यांनी स्वतंत्र वाट चोखाळली. त्यांनी रसिकतेने मराठीतील उत्तम लेखकांचे साहित्य वाचले आणि त्या साहित्याचे परिशीलनही केले. मात्र त्यांनी कधी कोणाचे अनुकरण केले नाही. स्वत:ची लेखन प्रकृती त्यांनी अचूक ओळखली होती. बाबा पाटलांना लघुकथा हा वाङ्मयप्रकार प्रिय होता आणि सुरुवातीपासून त्यांनी कथालेखनच केले. बाबा पाटील यांचे निसर्गावर विलक्षण प्रेम होते. त्यांच्या समवेत मी एकदा दाजीपूरच्या जंगलात भटकलो. त्यावेळी झाडे, पशू, पक्षी यांचे बाबांनी किती सूक्ष्म निरीक्षण केले होते याचा मला प्रत्यय आला. वृक्ष, वल्ली आणि वनचरे ही त्यांची सोयरीच होती; म्हणूनच 'एकूर' ही सुंदर प्राणीकथा हे लिहू शकले. बाबा हे स्वत: शिकारी नव्हते, परंतु शिकारी मित्रांसमवेत ते मनसोक्त फिरले होते. 'मागोवा' या कथेत फाटेदार मखमली शिंगे नव्यानेच कपाळावर उमटलेल्या सांबराचे बहारीचे वर्णन आहे, तर 'कैफ' या गोष्टीत राजा हा पाडा आपल्याच मालकाला घोसळून कसा मारतो याचे चित्तथरारक वर्णन आहे.

बाबांनी ग्रामीण भागातील माणसांचे रागलोभ हे जवळून पाहिले होते आणि त्यांच्या कथांतून अशा काहीशा आडमुठ्या, सरळ मनाच्या पण भडक डोक्याच्या माणसांची व्यक्तिचित्रे मार्मिकपणे रेखाटली आहेत. बाबा हे वास्तवाशी इमान दाखवत आणि साध्या सुध्या माणसांच्या सुखदु:खांचे अचूक चित्रण विविध घटनांतून, प्रसंगांतून

करीत. 'वाट ही चालावी' ही काहीशी वेगळी पण बहारीची कथा. सुरुवातीला श्रद्धेपासून दूर असलेला केशव एका म्हातारीला पाठीवर घेऊन विठोबाच्या दर्शनाला नेतो आणि दर्शन झाल्यावर त्या म्हातारीच्या डोळ्यातील भक्तिभावामुळे त्याचेही भान हरपून तो 'घालीन लोटांगण' म्हणून नाचू लागतो.

बाबा पाटील यांच्या दोन कथासग्रहांना राज्य पुरस्कार मिळाले. त्यांनी खूप लिहिले पाहिजे असे मी त्यांना सतत आग्रहाने सांगत असे, 'हो हो' म्हणत पण त्यांनी लिहिले नाही. बाबा पाटील हे एक उत्तम संपादक होते हे महाराष्ट्रात बऱ्याच जणांना माहीत नाही. माझ्या दोन पुस्तकांच्या हस्तलिखित प्रतींचे बाबांनी संपादन केल्यानंतरच ही मी पुस्तके छापावयास दिली. 'साधना' साप्ताहिकात त्यांनी काही वर्षे फार चोखपणे काम केले. लेखन, संपादन, मुद्रिते तपासणे असे कोणतेही काम त्यांच्यावर सोपविले की ते निर्दोष रीतीने होणारच असा त्यावेळचे संपादक यदुनाथ थत्ते यांना विश्वास होता.

बाबा पाटील हे राष्ट्र सेवादलामुळे माझे मित्र झाले. पुढे काही दिवस ते भूदान आंदोलनातही काम करीत होते. आचार्य विनोबा भावे आणि साने गुरुजी ही त्यांची श्रद्धास्थाने होती. बाबांच्यावर प्रेम करणारे अनेक मित्र होते. परंतु बाबांच्या कमालीच्या संकोची व हळव्या स्वभावामुळे त्यांची फार आबाळ झाली. कोल्हापूरला यशवंत महाराज पंडितांनी मात्र त्यांची खूप काळजी घेतली. बाबांच्या ६५व्या वाढदिवसाच्या वेळी आम्ही मित्रांनी त्यांचा जाहीर सत्कार केला. त्यांच्या उपेक्षित जीवनातील तो सुखद क्षण. त्या दिवशी बाबा समाधानी दिसले, थट्टा मस्करीत रमून गेले, याचे मला फार समाधान वाटले. गेली दोनतीन वर्षे त्यांची प्रकृती बरी नसे. काही महिन्यापूर्वी मी हॉस्पिटलमध्ये त्यांची भेट घेतली, त्यावेळी ते विरक्तपणे म्हणाले, "किती त्रास द्यायचा तुम्हां सर्वांना?" त्यांची जगण्याची उमेदच हरपत गेली. माझ्याहून बाबा चार वर्षांनी लहान. माझ्या बरोबर ते लहान भावासारखेच वागले. त्यांच्या निधनाची वार्ता समजली त्यावेळी अनेक जुन्या आठवणींचा कल्लोळ मनात उठला आणि मन काळवंडून गेले.

बाबा पाटील यांच्या स्मृतीस अभिवादन.

**–ग. प्र. प्रधान**



## काही वाचनीय अनुवाद

| पुस्तक | मूळ लेखक | अनुवादक |
|---|---|---|
| पर्व | डॉ. एस.एल. भैरप्पा | सौ. उमा कुलकर्णी |
| परिशोध | डॉ. एस.एल. भैरप्पा | सौ. उमा कुलकर्णी |
| चिदंबर रहस्य | डॉ. एस.एल. भैरप्पा | सौ. उमा कुलकर्णी |
| वंशवृक्ष | डॉ. एस.एल. भैरप्पा | सौ. उमा कुलकर्णी |
| चिदंबर रहस्य | के.पी.पूर्णचंद्र तेजस्वी | सौ. उमा कुलकर्णी |
| मायामृग | के.पी.पूर्णचंद्र तेजस्वी | सौ. उमा कुलकर्णी |
| नॉट विदाऊट माय डॉटर | बेट्टी महमुदी | सौ. लीना सोहोनी |
| आंधळी | कॅथरिन ओवेन्स पियर्स | शान्ता ज. शेळके |
| आंधळ्याचे डोळे | नॉर्मन कुझिन्स | शान्ता ज. शेळके |
| चौघीजणी | लुईसा मे अल्कॉट | शान्ता ज. शेळके |
| निमित्तानिमित्ताने : राजीव गांधी | राजीव गांधी | शान्ता ज. शेळके |
| डायरी ऑफ ॲन फ्रँक | ॲन फ्रँक | मंगला निगुडकर |
| चीपर बाय दी डझन | फ्रँक बंकर गिलब्रेथ | मंगला निगुडकर |
| सागरतीरी | ध्रुव भट | अंजनी नरवणे |
| फेरा | तसलिमा नासरिन | मृणालिनी गडकरी |
| निर्बाचित कलाम | तसलिमा नासरिन | मृणालिनी गडकरी |
| द प्लेन टुथ | निर्मलकुमार सिंग | माधव मोर्डेकर |
| फ्रीडम ॲट मिडनाईट | डॉमनिक लॅपिए | |
| | लॅरी कॉलिन्स | माधव मोर्डेकर |
| बोफोर्स | बी.एम. ओझा | माधव मोर्डेकर |
| भारत : नेहरूंपासून नंदनवनापर्यंत | शशि थरूर | मधुकर तोरडमल |
| सेक्स, स्कॉच अँड स्कॉलरशिप | खुशवंतसिंग | अनिल किणीकर |
| सत्यजित राय यांचे विश्व | बिद्युत सरकार | चारुलता पाटील |
| परिचय | अमृता प्रितम | माधवी देसाई |
| आय डेअर - किरण बेदी | परमेश डंगवाल | आशा कर्दळे |

# साहित्य वार्ता

## राजन गवस यांना विखे साहित्य पुरस्कार

"आत्मसन्मानासाठी लिहिलेले साहित्य समाज विसरून जातो. म्हणूनच नव्या पिढीने निर्मितीसाठी डोळसपणे पाहून, अनुभवाचा सच्चेपणा व दाहकता साहित्यातून मांडावी," असे प्रतिपादन प्रसिद्ध साहित्यिक व अस्मितादर्श'चे संपादक डॉ. गंगाधर पानतावणे यांनी विखे साहित्य पुरस्कार वितरणाच्या वेळी केले. साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्रा. द. मा. मिरासदार यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण झाले.

श्री. राजन गवस यांच्या 'कळप' कादंबरीस विखे साहित्य पुरस्कार, रामचंद्र पठारे यांच्या 'अवघड दुखण्यांची प्रकरणं' या कथासंग्रहास 'नगर जिल्हा साहित्य पुरस्कार' देण्यात आला. तसेच प्रा. दत्ताजीराव यांचा 'बळीवंत', चंद्रकांत पालवे यांचा 'तृणअग्निमळे' व डॉ. भास्कर शेळके यांनाही पुरस्कार प्रदान करण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून रावसाहेब कसबे, खासदार बाळासाहेब विखे, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के, प्राचार्य एस. एस. तोतरे व सिंधूताई सपकाळ उपस्थित होत्या. डॉ. पानतावणे यांनी म्हटले की, "स्वातंत्र्योत्तर काळात साहित्याची केंद्रे बदलत चालली असून, ज्यांच्यापर्यंत अक्षर गेले नव्हते, अशा विविध जातीसमूहांतून साहित्यनिर्मिती होऊ लागली. गेल्या काही दशकांतील साहित्य हे मध्यमवर्गीयांचे होते. विशिष्ट वर्गाच्या या साहित्यात जीवनातील अनेकविध अनुभवांना स्पर्श झाला नाही. अंत:करणाची भावना शब्दांत मांडावी असं मला वाटतं म्हणून लिहितो. सुखासाठी, आत्मसन्मानासाठी लिहितो, अशा प्रकारचे हे साहित्य होते. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेतून माणूस जागा झाला. अस्पृश्य, बहिष्कृत समाज ज्यांना माणूसपण व स्वातंत्र्य नाकारले गेले, ते जाणिवा व्यक्त करू लागले. तेच खरे परिवर्तनवादी साहित्य होय!"

"साहित्याबद्दल प्रचंड गैरसमज आहेत. प्रत्येक शब्द साहित्य असतो असे मानण्याचे कारण नाही. परंतु तरीदेखील आम्ही लिहू ते प्रमाण व तेच पुस्तक आदर्शवत असे मानल्यास साहित्यात दोष संभवतात. अनुभवाच्या खोलपणाची जाणीव त्यामुळे होत नाही. अनुकरण व नक्कल काही मर्यादेपर्यंत चांगली आहे. अनुकरणापेक्षा नक्कल कृतघ्न असते. त्यातून चांगली साहित्यनिर्मिती होत नाही."

प्रा. मिरासदार म्हणाले, "जो लिहिलं जातं, वाचलं जातं, ज्यातून माणसाला आनंद मिळतो ते खरं साहित्य! माणसाचे मन हाच खरा साहित्याचा विषय आहे. मनाचे पृथक्करण करता येत नाही. मात्र अनुभवातून मनाचा शोध घेता येतो, त्याचे चित्रण साहित्यातून होते."



## क्रॉसवर्डतर्फे भारतीय इंग्रजी कादंबरीस दोन लाख रुपयांचा पुरस्कार

भारतीय लेखकाने लिहिलेल्या व भारतात प्रकाशित झालेल्या उत्कृष्ट मूळ इंग्रजी कादंबरीसाठी क्रॉसवर्ड या ग्रंथ भांडारातर्फे दोन लाख रुपयांचा वार्षिक पुरस्कार सुरू करण्यात आला आहे. इंडिया बुक हाऊसशी संलग्न असलेल्या क्रॉसवर्ड ग्रंथ भांडाराने पुस्तकविक्रीमध्ये नव्या तंत्राचा वापर केला असून या पुरस्काराच्या निवडीतही आंतरराष्ट्रीय स्पर्धांच्या तोडीची प्रक्रिया अवलंबिण्यात येणार आहे.

१५ सप्टेंबर १९९७ ते १४ सप्टेंबर १९९८ या काळात प्रकाशित झालेल्या पुस्तकांसाठी हा पुरस्कार असून त्यात संपूर्ण कादंबरी अथवा लघुकथांचा संग्रह यांचा समावेश राहील. यातील सर्व प्रवेशिका या प्रकाशकांनी पाठवायच्या आहेत. पुस्तकाचा लेखक भारतीय नागरिक असावा, त्याच्याकडे भारतीय पासपोर्ट असावा किंवा तो भारतात जन्मलेला असावा, असे पर्याय ठेवून भारतीयत्वाची अट शिथिल ठेवण्यात आली आहे.

नामवंत लेखक, पत्रकार, समीक्षक, शिक्षणतज्ज्ञ यांचा समावेश असलेले पाच जणांचे परीक्षक मंडळ १४ नोव्हेंबरला अंतिम निवडीचे काम करील. यापूर्वी प्रत्येक परीक्षकाला पाच ते सहा पुस्तके दोन महिन्यांसाठी वाचण्यास देण्यात येतील.

पुढील वर्षापासून लहान मुलांची पुस्तके, इतर भाषांतून इंग्रजीत अनुवादित झालेली पुस्तके यांच्यासाठीही हा पुरस्कार देण्याची योजना आहे, असे आर. श्रीराम यांनी सांगितले.

## पंढरपुरात शासनातर्फे लावणी शाळा काढणार

ढोलकी फडाच्या तमाशातून आणि लोकनाट्य कलाकेंद्रातून 'लावणी' आता फारशी दिसत नाही. बदलणाऱ्या परिस्थितीतही या पारंपरिक कलेचे जतन व्हायला हवे, या उद्देशाने शासनाने पंढरपूर येथे 'लावणी शाळा' काढण्याचे ठरविले आहे, अशी माहिती राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री प्रमोद नवलकर यांनी दिली.

लोककलांमध्ये मानाचे स्थान आहे ते तमाशाला. कलेच्या माध्यमातून मनोरंजनाद्वारे सर्वाधिक प्रेक्षकवर्ग खेचण्याचे काम या लोककलेने केले आहे, असे सांगून नवलकर म्हणाले, "या ढोलकी फडाच्या तमाशाला खरा जिवंतपणा आणला तो मराठमोळ्या लावणीने. परंतु, सांस्कृतिक परंपरा असूनही 'लावणी'ची परंपरा कमी होत आह याकडे लक्ष गेले. त्यामुळे पंढरपूर येथे राज्य शासनातर्फे व ज्येष्ठ कलावंतांच्या सहकार्यातून लावणी शाळा काढण्याचे ठरविले."

लावणी शाळा कशी हवी, तिचा उद्देश काय हवा, त्यात कोणकोणत्या बाबींचा समावेश हवा. या स्वरूपाची माहिती एकत्र करून सांस्कृतिक कार्य. खात्याकडे प्रस्ताव देण्याची जबाबदारी पंढरपूरचे लावणी गायक व अभ्यासक ज्ञानेश्वर उत्पात यांच्यावर सोपविली

होती. त्यांनी तयार केलेला प्रस्ताव खात्याकडे आला आहे. राज्यातील नव्या कलावंतांनाही या शाळेचा लाभ घेता येईल. कलावंतांच्या कामाची वेळ लक्षात घेऊन, ही लावणी शाळा अर्धवेळ भरविण्याची कल्पना असल्याचेही नवलकर यांनी यावेळी सांगितले.

## कलावंतांना मानधन

राज्यातील जवळपास ११ हजार कलावंतांना मागील वर्षभरात सुमारे ८ कोटी २५ लाख रुपये मानधनापोटी देण्यात आले. या वर्षी एक हजार १४९ नव्या मागणी अर्जांची छाननी होत आहे. त्यामुळे वर्षभरात १० कोटी रुपयांचा निधी कलावंतांच्या मानधनासाठी लागणार असल्याचे नवलकर यांनी सांगितले. मानधनामध्ये सातत्य नसते. चार-पाच महिन्यांचाही विलंब झाल्यास वृद्ध कलावंतांचे हाल होतात, याकडे लक्ष वेधले असता नवलकर म्हणाले, ''राज्य शासनाकडून कलावंतापर्यंत मानधनाची रक्कम पोहोचेपर्यंत अनेक टप्पे पार पाडावे लागतात. बिचारे कलावंत हेलपाटे मारतात. त्यांना अधिकारी वर्गाकडून चांगली वागणूक मिळत नाही, कुठेतरी चिरीमिरी मागितली जाते.... अशा अनेक तक्रारी आल्या आहेत. त्यामुळे लाचारीने मिळणारी मदत कलावंतांच्या वाट्याला जाऊ नये. ती आपुलकीने व सहजपणे मिळावी, असाच प्रयत्न आहे. त्यासाठी १२ महिन्यांचे १२ धनादेश वर्षाच्या प्रारंभीच बँकेकडे जमा करून ठेवण्याची योजना आहे. यातून दर महिन्याला ठराविक वेळी वयोवृद्ध व गरजू कलावंतांना आपल्या खात्यातून मानधन घेता येईल. या नव्या उपाययोजनेमुळे कलावंतांचा त्रास निश्चितच कमी होईल.''

## धुळे येथे मराठी अभ्यास परिषदेचे दहावे अधिवेशन

भारतीय मराठी अभ्यास परिषदेचे दहावे अधिवेशन १ ते ३ जानेवारी ९९या कालावधीत धुळे येथे आयोजित करण्यात आले आहे. या अधिवेशनात 'साहित्य आणि राजकीय आशय' या विषयावर चर्चासत्र होणार आहे.

धुळे येथे का. स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था सन १९८७ पासून मराठी वाङ्मय, भाषा व संस्कृती या क्षेत्रात संशोधन अध्ययन-अध्यापनाचे कार्य करीत आहे. मराठी भाषा व संस्कृती यांच्या विकासासाठी संस्थेने निरनिराळे उपक्रम हाती घेतले आहेत. त्यापैकीच 'भारतीय मराठी अभ्यास परिषद' हाही एक उपक्रम आहे. राजकीय आशयाची समग्रता लक्षात घेऊन सत्ता, शोषण, स्वातंत्र्य, दास्य, धुरीणत्व, हवक आणि कर्तव्ये, हिंसा-अहिंसा, या पायाभूत संकल्पनांची व्यापक चर्चा करणे, विविध राजकीय प्रणालींचा व या संकल्पना घटकांचा संदर्भ ध्यानात घेऊन वाङ्मयीन घडामोडी आणि साहित्य संहितेतील आशयाची चिकित्सा व समीक्षा करणे हे या चर्चेचे मुख्य केंद्र असेल. आमंत्रितांखेरीज



स्वयंस्फूर्तपणे निबंध पाठविणाऱ्यांचे निबंधही अधिवेशनात सादर केले जातील व नियतकालिकाच्या विशेषांकात प्रसिद्ध केले जातील. सप्टेंबर अखेर आपापल्या निबंधांची संहिता संस्थेकडे पाठवावी. अधिवेशन सर्वांसाठी खुले असून रु. १५० शुल्कात तीन दिवसांची भोजन निवास-व्यवस्था केली आहे.

## लोकपरंपरेचा धागा सुटल्याने नव्या पिढीचे जीवनाशी नाते तुटले

महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे राजन गवस यांच्या 'कळप' या कादंबरीस 'शंकर पाटील पुरस्कार' देण्यात आला. समीक्षक डॉ. अरविंद वामन कुलकर्णी हे अध्यक्षस्थानी होते. ''लोकपरंपरेचा धागा सुटल्याने साठोत्तरी पिढीचा येथील जीवनाशी संबंध तर तुटलाच, पण स्वत:चे नवे अस्तित्वभानही सापडले नाही,'' अशी खंत या पिढीचे प्रतिनिधी राजन गवस यांनी पुणे येथे व्यक्त केली.

''१९६० नंतर शिक्षणाची लाट वाढू लागली. शिक्षित तरुणांकडून शेतीकडे दुर्लक्ष होऊ लागले. लोकपरंपरांचा व लोकबोलीचा प्रचंड उपहास करून खेड्यांच्या उद्ध्वस्तीकरणाची प्रक्रिया सुरू झाली. यात आपले स्वत:चे वेगळे असे मात्र काही गवसले नाही.''

''कोल्हापूरची भूमी, कोल्हापूरची माणसे आणि कोल्हापूरची रग ही भाषेत उतरल्याने शंकर पाटील यांच्या भाषेतले वेगळेपण जाणवते. लोकभाषा आणि परंपरा साहित्यात उतरल्याने त्याचे सामर्थ्य दृढ होते.''

''इच्छा असो अगर नसो, सर्वांना कळपात कळपाच्या नियमाप्रमाणे राहावे लागते. त्या गदारोळामध्ये माणूस स्वत:चे अस्तित्व हरवतो, गोतावळ्यापासून दूर जातो. या कादंबरीमध्ये हे दुरावलेपण अतिशय परिणामकारकरीत्या साधले गेले आहे.'' असे डॉ. कुलकर्णी यांनी म्हटले. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले म्हणाले, ''आपल्याला अंतर्मुख व्हायला लावेल असे तरुणांचे विश्व उलगडण्याचे सामर्थ्य या कादंबरीत आहे.''

## टागोरांची अप्रकाशित कविता रुमानियाच्या शिक्षिकेकडे

नोबेल पारितोषिक विजेते कवी रवींद्रनाथ टागोर यांची अद्याप अप्रकाशित असलेली एक कविता आपल्याला मिळाली असल्याचा दावा रुमानियन प्रकाशक एडिचुरा पैडेला यांनी केला आहे. एक रुमानियन प्राथमिक शिक्षिका श्रीमती फ्लोरीका बोतेझ यांना १९२७ ही कविता रवींद्रनाथांनी मध्ये पाठवली होती.

श्रीमती डॅनिएला नैस्कू यांनी टागोर रोमानिया अमिनतिरी 'रुमानियाचे स्मृतीतील टागोर' या नावाचे पुस्तक संपादित केले आहे. या पुस्तकाला रुमानियातील भारतीय राजदूत राजीव डोग्रा यांनी प्रस्तावना लिहिली आहे. ते आपल्या प्रस्तावनेत म्हणतात की, इतिहासाचे

पुनरुज्जीवन करून गेल्या सात दशकांना एका अदृश्य पुलाद्वारे जोडण्याचे कामच हे पुस्तक करते.

रोमानियन आणि इंग्रजी अशा दोन्ही भाषांतील या पुस्तकामध्ये टागोर १९२६ मध्ये रुमानिया भेटीवर आले असताना ज्या ज्या वृत्तपत्रांतून आणि मासिकांतून त्यांच्या भेटीदरम्यानची वृत्ते छापून आली त्या सर्वांचा यात समावेश आहे.

वर उल्लेख केलेली अप्रकाशित कविता, कोन्स्टान्टा येथील चार नंबर शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती बोतेझ यांना टागोर यांचे सहाय्यक श्री. चक्रवर्ती यांनी आपल्या पत्रासह पाठविली होती. त्यावर विश्वभारती विद्यापीठाचा शिक्का आहे. या कवितेचा रुमानियन भाषेत अनुवाद केल्यानंतर दुर्दैवाने टागोरांची स्वाक्षरी असलेली मूळची कविता गहाळ झाली. या पुस्तकाच्या संपादिका डॅनिएला नैस्कू यांनी त्या कवितेच्या रुमानियन प्रतीवरून तिचा विषय या पुस्तकात मांडला आहे. श्रीमती बोतेझ यांना त्या कवितेची प्रत श्रीमती नैस्कू यांनी दिली. पुस्तकात या कवितेसंदर्भात प्रसिद्ध झालेल्या लेखामुळे फ्लोरीका बोतेझ आणि टागोर यांची भेट कशी झाली हे कळते.

---

## 'धुक्यातील दीप'चे प्रकाशन

औंध येथील राजा भगवंतराव महाविद्यालयाचे प्राचार्य आणि डॉ. शिवराम माळी यांच्या षष्ट्यब्दिपूर्ती निमित्त कोल्हापूर येथे दि. १६ ऑगस्ट १९९८ रोजी डॉ. य. दि. फडके यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. कोल्हापूरचे महापौर शिवाजीराव कदम हे अध्यक्षस्थानी होते. डॉ. चंदूलाल दुबे, शंकर सारडा, अॅड. के. व्ही. पाटील, न्यायमूर्ती माळी प्रभृतींची गौरवपर भाषणे झाली. याचवेळी 'धुक्यातील दीप' या गौरवग्रंथाचेही प्रकाशन झाले. त्यात माळी यांच्या साहित्याचे व व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडवणारे ८४ लेख आहेत. डॉ. माळी यांनी 'स्वच्छंदतावादी नाटक आणि मनोविज्ञान', हा प्रबंध लिहिला असून ललकार, आशा की लहरें, वज्रमुठी हे त्यांचे काव्यसंग्रह प्रसिद्ध आहेत. पीएच.डीचे मार्गदर्शक म्हणूनही त्यांनी काम केले आहे. (पत्ता – ललकार, रत्नाप्पा कुंभारनगर, सोसायटी नं. ५, कोल्हापूर ४१६०१३.)

---

## प्रा. मधु जामकरांचे 'आकाशदिवे'

परळी साहित्य संमेलनाचे कार्यवाह आणि एक नामवंत साहित्यिक वक्ते प्रा. मधु जामकर यांच्या बावीस व्यक्तिचिंतनांचा आकाशदिवे हा संग्रह नुकताच प्रतिमा प्रकाशनतर्फे प्रकाशित झाला. डॉ. आनंद यादव यांनी त्याबद्दल म्हटले आहे : "जामकर हे मूळात कविप्रकृतीचा स्थायी भाव असलेले मराठीचे अभ्यासू प्राध्यापक आणि समीक्षक. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा या लेखांतून सर्वत्र उमटलेला आहे. कुटुंबातील आजोबा, वडील, पत्नी यांच्याविषयी चिंतन करताना प्रा. जामकरांची वृत्ती हृद्य व काव्यात्म होते. मित्रांविषयी लिहिताना ते स्वत:च भावव्याकुळ व हळवे बनतात. अनेक साहित्यिक, समीक्षक, विचारवंत आणि आदरणीय व्यक्तिविभूती विविध नात्यांनी त्यांच्या जीवनात येऊन गेलेल्या दिसतात. त्यांच्या जीवनातील खास प्रसंग साधून... त्यांनी हे लेखन केलेले आहे. त्यांच्या चिंतनशील वृत्तीला सामान्य माणसातील असामान्यपणही यशस्वीपणे शोधता येते."

---

## स्मृतिचिन्हाऐवजी 'अक्षर' ग्रंथांची भेट

बृहन्महाराष्ट्र मंडळांच्या दिल्लीत झालेल्या अधिवेशनाच्या वेळी उपस्थित तीनशेवर प्रतिनिधींना स्मृतिचिन्हाच्या ऐवजी चार ग्रंथ भेट देण्याचा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. सज्जनगडावरून आलेला दासबोध, आळंदी संस्थानने प्रसिद्ध केलेली ज्ञानेश्वरी, मराठी इंग्रजी शब्दकोश आणि इंद्रप्रस्थ ही स्मरणिका अशा चार अक्षर स्मृतिचिन्हांची भेट देण्याची ही कल्पना सर्वांनाच स्वागतार्ह वाटली. महाराष्ट्र परिचय केंद्राचे प्रमुख रा. मो. हेजीब, कार्यवाह अरविंद दीक्षित प्रभृतींनी या कल्पनेचा पाठपुरावा केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन.

---

## अरुण सारथी यांच्या 'शोध महात्मा गांधींचा'चे प्रकाशन

२० जुलै रोजी अरुण सारथी यांनी लिहिलेल्या महात्मा गांधींवरील द्विखंडात्मक ग्रंथाचे प्रकाशन झाले. अस्मिता प्रकाशनने अकराशेवर पृष्ठांच्या ह्या ग्रंथाच्या दोन खंडांची किंमत सातशे रुपये ठेवली आहे. महात्मा गांधींनी कधीही राजकारण केले नसते तरीही दुसऱ्या महायुद्धानंतर अनेक देश स्वतंत्र झाले तसा हिंदुस्थानही स्वतंत्र झाला असता, गांधीजींनी स्वत:च्या आध्यात्मिक महत्त्वाकांक्षेमुळे एकूण राजकारणाला चुकीचे वळण दिले, अहिंसा व हिंदुमुस्लीम ऐक्य या त्यांच्या आवडत्या कल्पनांची धूळधाण उडाल्याचे दृश्य त्यांना आयुष्याच्या अखेरच्या पर्वात बघावे लागले. अशी मते मांडून त्याबद्दल अभ्यासपूर्ण विवेचन करण्याचा हा प्रयत्न आहे.

---

## पुस्तके घ्या, पूजा अंक भेट मिळवा

कलकत्त्यात पुस्तकांच्या विक्रीसाठी काही ग्रंथविक्रेत्यांनी आतापासूनच जाहिराती देणे सुरू केले आहे. एक हजार रुपयांची पुस्तके घ्या आणि आपल्या आवडीचा पूजा अंक भेट मिळवा असे आवाहन त्यात करण्यात आले आहे. महाराष्ट्रात जसे दिवाळी अंक निघतात तसे बंगालमध्ये पाचपाचशे पृष्ठांचे वा त्यापेक्षाही दणदणीत पूजा अंक नवरात्रात निघतात; आणि त्यांच्या किंमतीही शंभर रुपयापर्यंत असतात. सुमारे शंभर पूजा अंक कलकत्त्याला

निघतात. जनसत्ता हे हिंदी दैनिक एक्सप्रेस गटातर्फे निघते; त्याचाही दिवाळी अंक दरवर्षी मोठा दिमाखदार निघतो; आणि तोही उत्तम खपतो. पूजा अंकांच्या प्रतींची संख्याही मराठीच्या तुलनेने जास्त असते असे जाणकार सांगतात. एकेका अंकात सहा सहा कादंबऱ्या – आणि त्याही नामवंत लेखकांच्या लेखणीतून उतरलेल्या – म्हणजे वाङ्मयप्रेमींना मोठीच मेजवानी वाटते.

## पुणे नगर वाचन मंदिरातर्फे उत्कृष्ट ग्रंथांना पुरस्कार

पुणे नगर वाचन मंदिरातर्फे प्रतिवर्षी तीन उत्कृष्ट ग्रंथांना प्रत्येकी रुपये एकहजाराचा पुरस्कार दिला जातो. यंदाचे पुरस्कार १९९८मध्ये (१ जानेवारी ते १५ डिसेंबर) प्रकाशित झालेल्या ग्रंथांना देण्यात येणार आहेत.

**१३ जानेवारी – कै. श्री. ज. जोशी पुरस्कार :** ललित लेख, प्रवास, व्यक्तिचित्रे
**७ फेब्रुवारी – कै. ह. स. गोखले पुरस्कार :** संतवाङ्मय स्वतंत्र वा संपादित ग्रंथ
**६ मार्च – कै. श्री. ना. बनहट्टी पुरस्कार :** वैचारिक स्वरूपाचे ग्रंथ

ज्या लेखकांना वा प्रकाशकांना या पुरस्कारासाठी ग्रंथ पाठवावयाचे असतील त्यांनी ग्रंथाच्या दोन प्रती "कार्यवाह, पुणे नगर वाचन मंदिर, १८१ बुधवार पेठ, बेलबागेसमोर, पुणे २." या पत्त्यावर पाठवाव्यात.

## 'आत्मनिवेदन दयार्णवांचे' पुस्तकाचे प्रकाशन

स्वातंत्र्यसैनिक व ज्येष्ठ प्रकाशक दर्याणव कोपर्डेकर यांनी मृत्यूपूर्वी लिहिलेल्या 'आत्मनिवेदन दयार्णवांचे' या पुस्तकाचे प्रकाशन श्री. बाळासाहेब भारदे यांच्या हस्ते झाले. डॉ. हेमचंद्र दयार्णव कोपर्डेकर यांनी हे पुस्तक संपादित केले आहे.

या प्रसंगी श्री. भारदे म्हणाले, 'राष्ट्रमुक्ती व मानवमुक्ती या प्रेरणा त्या वेळी स्वातंत्र्यसैनिकांपुढे होत्या. अध्यात्म व राष्ट्रवाद या दोन्हींचा संगम दयार्णव कोपर्डेकर यांच्यात झालेला दिसून येतो. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर, त्यांनी प्रकाशक या नात्याने सांस्कृतिक क्षेत्रात काम केले. मराठी भाषेची समृद्धी संत व ग्रंथ वाङ्मयामुळे झाली आहे. कोपर्डेकर यांनी 'हरिवरदा' या ग्रंथाचे प्रकाशन केले. हा ग्रंथ मराठी वाङ्मयातील एक मानाच तुरा आहे."

## श्रद्धांजली

## सुमती क्षेत्रमाडे यांचे वृद्धापकाळाने निधन

मराठी व गुजराती भाषेतील साहित्यात स्वत:ची वेगळी छाप उमटविणाऱ्या ख्यातनाम साहित्यिका डॉ. सुमती क्षेत्रमाडे यांचे दि. ७ ऑगस्ट १९९८ रोजी बेलापूर येथील नर्मदा निकेतन या वृद्धाश्रमात वृद्धापकाळाने निधन झाले. त्या ८४ वर्षांच्या होत्या.

क्षेत्रमाडे यांच्या 'आधार', 'सीमारेषा', 'वृंदा', 'महाश्वेता', 'मैथिली', 'गौरांगप्रभु', 'मेघमल्हार', 'अनुहार' या कादंबऱ्या बऱ्याच लोकप्रिय झाल्या. शरत्चंद्र चतर्जी यांच्या जीवनावर आधारित 'जीवनस्वप्न' या कादंबरीस वाचकांची विशेष दाद मिळाली. 'मेघमल्हार' या कादंबरीचा गाभा शास्त्रीय संगीत हाच होता. क्षेत्रमाडे यांच्या वृंदा कादंबरीवर दूरदर्शन मालिका सादर करण्यात आली होती. सुप्रसिद्ध चरित्र अभिनेते गजानन जहागिरदार यांनी याच कादंबरीवर 'सुखाची सावली' हा चित्रपट निर्माण केला होता. या चित्रपटाने व दूरदर्शन मालिकेने बरीच लोकप्रियता मिळवली.

डॉ. क्षेत्रमाडे यांचे सारे जीवन अत्यंत सुस्थितीत गेले. त्या अविवाहित होत्या. वैद्यकीय व्यवसाय त्यांनी निष्ठेने केला. निव्वळ पैसा मिळविण्याच्या हेतूने त्याकडे कधी पाहिले नाही. त्याऐवजी लेखनातच त्या अधिक रमल्या. भाऊसाहेब खांडेकर त्यांचे आवडते साहित्यिक होते व त्यांच्याच मार्गदर्शनाखाली त्यांनी साहित्यक्षेत्रातील वाटचाल केली. त्यांना मोठा वाचकवर्ग लाभला. देश-विदेशांत त्यांनी बराच प्रवास केला होता.

क्षेत्रमाडे यांच्या या साहित्यसेवेचा दिल्लीतील साहित्य परिषदेने पुरस्कार देऊन गौरव केला होता. मराठी खेरीज अन्य भारतीय भाषांत लेखन केल्याबद्दलही त्यांना पुरस्कार मिळाला होता.

कोकणातील लांजा तालुक्यात झापडे या खेड्यात जन्मलेल्या डॉ. क्षेत्रमाडे यांनी वैद्यकीय क्षेत्रात उच्च शिक्षण घेऊन काही काळ बडोदा संस्थानात वैद्यकीय अधिकारी म्हणून नोकरी केली व नंतर १९४८ पासून कोल्हापुरात वैद्यकीय व्यवसाय सुरू केला. परदेशात शिक्षण घेऊन आलेल्या कोल्हापुरातील पहिल्या महिला डॉक्टर या दृष्टीने त्यांना त्या क्षेत्रात अल्पावधीतच प्रतिष्ठा व प्रसिद्धी मिळाली; पण त्याहीपेक्षा लेखिका म्हणून त्यांना साऱ्या महाराष्ट्रात लौकिक लाभला. वैद्यकीय व्यवसायाच्या व्यापातून वेळ काढून त्या सातत्याने लिहीत राहिल्या. सीमारेषा, अनुहार, मेघमल्हार, वृंदा, युगंधरा, महाश्वेता, गीता... वगैरे चौदा कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या. दोन नाटके व काही कथाही त्यांच्या नावावर आहेत; पण प्रामुख्याने कादंबरीकार म्हणूनच त्या नावारूपाला आल्या. ऐतिहासिक व पौराणिक विषयांवरच त्यांनी अधिकतर कादंबऱ्या लिहिल्या. कोड असलेल्या मुलीवरील 'महाश्वेता' या कादंबरीने त्यांना विशेष प्रसिद्धी मिळाली. त्यांच्या काही कादंबऱ्यांची गुजरातीत भाषांतरे झाली व त्यातील 'वर्सो मेघमल्हार'ला केंद्र सरकारचे पारितोषिकही मिळाले. काही सामाजिक कादंबऱ्यांना वैद्यकीय व्यवसायाची पार्श्वभूमी कथाबीजे लाभलेली आहेत. कादंबरीतील त्यांचे पात्रे अत्यंत प्रभावी वाटतात. किंबहुना हे त्यांच्या लेखणीचे वैशिष्ट्यच होते.

# पुस्तक परिचय




**मूल असलं तरच**
**आपण आईबाप असतो;**
**मूल तर हवंच**

## मूल

**संजोग वीरकर**

'मूल' ही संजोग वीरकर यांची पहिलीच कादंबरी. खरे तर एका अर्थाने हे आत्मकथनच. बरेच दैनंदिनीच्या स्वरूपात आलेले. अपत्यप्राप्तीच्या संदर्भातले एका तरुण पित्याचे हे आर्त निवेदनच आहे. थोडाफार काल्पनिक भागही त्यात असेल, परंतु त्याचे वास्तव कोणाही सहृदय वाचकाला झपाटल्यावाचून राहणार नाही.

आर्किटेक्ट अनय वाठारे आणि एका वृत्तपत्र कार्यालयात अकाउंटस विभागात काम करणारी सुकन्या या नवदांपत्याची ही कथा आहे. या दांपत्याला सिद्धी नावाची मुलगी होते. पण ती दीडदोन महिन्यांची असतानाच देवाघरी जाते. साहजिकच तिच्या मृत्यूचे भयानक दु:ख या दांपत्याला होते. तशात या दांपत्याची या पहिल्या अपत्याबाबतची मानसिक गुंतवणूकही मोठी असते. गर्भधारणेपासूनच्या अपत्यसंभवापर्यंतच्या दिवसांची दैनंदिनी अनय लिहित असतो. आपल्या स्वत:च्या, पत्नीच्या, नातलगांच्या, वैद्यकीय सल्लागारांच्या मतमतांतरांची नोंद ठेवत असतो. लग्न झाल्यावर वर्ष उलटले, तरी अपत्यसंभवाची लक्षणे दिसत नसल्याने अस्वस्थ होऊन डॉक्टरांकडे जाणारे व नाना शंका विचारणारे दांपत्य; सुकन्या सोनोग्राफी वगैरे तपासण्या करून आपल्यात काही त्रुटी नाही ना याचीही खातरजमा करून घेते. क्युरेटिन केल्यावर जो रिपोर्ट मिळतो त्यात मूल होण्यासाठी आवश्यक असणाऱ्या बीजांडाची निर्मिती झाली नसल्याचे आढळून येते. मूल होण्यासाठी आवश्यक ती गोष्टच निर्माण होत नाही, मग



मूल हे एक स्वप्नच राहणार असे जाणवून नैराश्य येते. पण डॉक्टर गुणे सांगतात की ''ओव्हरी निर्माणच होत नाही अशा केसेस दुर्मिळ असतात. सर्वसाधारण स्त्रीची एकाद दुसरी पाळी मिस होते; पण निसर्गानं स्त्रीला जन्मत:च लाखो बीजाडं सुप्त रूपात बहाल केलेली असतात. मुलगी वयात आल्यावर हार्मोन्सच्या प्रभावानं तीनचार बीजाडं वाढ होऊन बीजांडकोशातून म्हणजे ओव्हरीतून, बीजाडं वाहिनीतून गर्भाशयात येतात. तिथं त्यातील एखादं बीजाडं अठरा ते बावीस मिलिमीटरपर्यंत वाढते. नंतर परिपक्व होऊन फुटते. त्या काळात त्याचा शुक्रजंतूशी मिलाफ झाला तर गर्भधारणा होते.''

डॉक्टर पुन्हा तपासणी करायला सांगतात; व्यवस्थित वाढलेल्या पण वरचं आवरण न फुटलेल्या बीजांडाचं आवरण भंग करण्यासाठी हार्मोन्सचं इंजेक्शन देतात आणि 'आता आजपासून तीन दिवस रोज रात्री संबंध ठेवा' असा सल्ला देतात.

असं चारपाच महिने करूनही काहीच होत नाही, तेव्हा डॉक्टर कानडे यांच्याकडे जाऊन गर्भाशयाचे फोटो काढून घेतात. बीजाडं गर्भाशयाकडे वाहून नेणाऱ्या फेलोपिन ट्युब्ज नळ्या मोकळ्या आहेत की नाही हे पाहण्यासाठी ही तपासणी असते. त्या नळ्यांना सूज आली किंवा त्या बंद झाल्या असल्या तर त्या मोकळ्या कराव्या लागतात. या तपासण्यांचा शारीरिकच नव्हे तर मानसिक ताणही पडतो. त्यामुळे सुकन्या उदास होऊन म्हणते, ''नको रे आता टेस्ट बिस्ट करायला फार त्रास होतो. धाकधूक वाटते. खूप उदास-निराश वाटतं... अनय, आपण आता एक बाळ दत्तक घेऊ या.'' तशातच अनयला साडेसाती चालू असते. त्या ट्युबमध्ये काही दोष नसतो; पण अपत्यप्राप्तीसाठी ती इंजेक्शन्स विशिष्ट दिवसात दरमहा घेणे आवश्यक असते. साडेसाती संपल्याबरोबर पुन्हा डॉक्टरांकडे जाऊन ती इंजेक्शन्स घेण्याचा क्रम सुरू होतो. पण त्यातही इतर तपासण्या असतातच. या टेस्टच्या रिपोर्टमध्ये निगेटिव्ह असे काही आढळत नाही. तेव्हा निसर्ग हा लहान मुलासारखा रुसलाय, तो पुन्हा मूड पालटल्यावर हसेल असे मानता येते.''

पहिल्या कन्येचा सिद्धीचा जन्म हा या कादंबरीतला एक टप्पा. सिद्धी अपुऱ्या दिवसांची असते. कमी वजनाची असते. तिची रोगप्रतिकारक शक्तीही कमी असते. हवेतून जंतूंचा संसर्ग लगेच होऊन अशा मुलांच्या रक्तात जंतू भिनून ते मेंदूपर्यंत जातात आणि मेंदूला सूज येते. सात दिवसांच्या सिद्धीला मॅनिनजायटिस होतो. पण तब्येत थोडी सुधारू लागते. धोका टळतो. तिला घरी नेण्याची परवानगी मिळते. पण तरीही कसलाही धोका नको म्हणून सिद्धीला पुन्हा आठ दिवस डॉ. पुजारींच्या हॉस्पिटलमध्येच ठेवण्यात येते. त्या आठ दिवसात कसलाही त्रास होत नाही; पण इन्फेक्शनच्या भीतीने सिद्धीचा मुकाही घेण्याचा मोह अनय-सुकन्या यांना आवरावा लागतो. नंतर तिला घरी नेले जाते. एक महिना जातो. दर आठवड्याला वैद्यकीय तपासण्या चालू राहतात. पण पुढे तिला जुलाब सुरू होतात. ती शॉकमध्ये जाते. किंग

हॉस्पिटलमध्ये तिला ठेवण्यात येते. अतिदक्षता विभागात हलवण्यात येते. तिला जबरदस्त इन्फेक्शन झालेले असते. शरीराला न पेलतील असे जुलाब झाल्याने ती सेप्टिक शॉकमध्ये जाते. तिला ॲसिडायसिस होते. तिच्या शरीरातले गॅसेसचे प्रमाण वाढते. अवयवांवर ताण पडतो. रक्तातल्या ऑक्सिजन, कार्बन डायऑक्साइडचे प्रमाण असमतोल होते. अशा वेळी श्वासातून प्राणवायू पुरेसा मिळत नाही. त्यामुळं हृदयाचं कार्य बिघडतं, युरियाचं प्रमाण वाढून किडनी फेल होऊ शकते असे धोके डॉक्टर स्पष्ट करून सांगतात.

'आपल्या परीचं काही खरं नाही' याची जाणीव अनय-सुकन्या यांना होते. 'ती बेडवर दिसूच नये इतकी अशक्त होते. सताड उघडे डोळे, पण त्यात भावना नाही. उघड्या ओठांमधून धपापता श्वासोच्छवास तेवढा चालू. झुळकीसरशी भुरभुरणारं जावळ... फक्त झुळका ऑक्सिजनच्या...'' असं दृश्य पाहणंही नकोसं वाटतं. तिचं हार्ट फंक्शन डिस्टर्ब होतं. रक्त द्यावं लागतं. पण तशात तिला फेशियल पॅरॅलिसिस होतो. तोंड वाकडं होतं. पायांना रक्तपुरवठा न झाल्यानं पायाची बोटं काळीनिळी पडतात. ती गळून पडण्याची शक्यता असते. पायही कापावा लागेल अशी भीती असते. डॉक्टर तिचं मरण लांबवत राहतात. पण तिच्या मरणाचं वास्तव स्वीकारण्याची मानसिक तयारी अनयला करावी लागते. पेशंटची ट्रीटमेंट थांबवण्याचा निर्णय घेऊन सिद्धीला घरी हलवतात. आणि दीडच दिवसात ती शेवटचा श्वास घेते. डॉक्टर निनाद तिला अखेरचं तपासतात आणि आधीच लिहिलेल्या डेथ सर्टिफिकेटवर तारीख टाकतात.

अनय-सुकन्या या दोघांनाही नंतर स्वतःला सावरण्यासाठी खूप प्रयत्न करावे लागतात. या पार्श्वभूमीवर वर्ष गेल्यावर दुसऱ्या अपत्याच्या संभवाचा ध्यास लागतो, आणि त्या प्रयत्नांची बरीचशी वैद्यकीय उपचारांच्या अंगाने जाणारी हकीकत 'मूल' मध्ये येते. विविध प्रकारच्या तपासण्यांचे तपशील तर येतातच. डॉक्टर शहा यांच्याकडे आर्टिफिशियल इनसेमिनेशनसाठी जाऊन तेथील ट्रीटमेंटही काही काळ घेण्यात येते. त्या ट्रीटमेंटचे तपशीलही अत्यंत विदारक आहेत. प्रयत्न करूनही भरवसा नाहीच. दत्तक घेण्याचा मार्ग समोर कायम असतो; परंतु शक्य तर स्वतःचंच मूल आपल्या घरात असावं हा विचारही प्रबळ असतो.

त्या प्रयत्नात खजुराहोच्या ट्रिपवरही अनय-सुकन्या जातात. ''लग्नानंतरच्या पहिल्या वर्षातला अनय सुकन्याला खजुराहोत परत मिळाला होता. चैतन्यानं रसरसलेला.. फुलाभोवती रुंजी घालणाऱ्या भुंग्यासारखा अनय तिच्या आसपास भिरभिरत असायचा. या साऱ्या दिवसात सिद्धीची आठवण त्यांना एकदाही झाली नाही...'' (७९) 'सेक्समध्ये डिझायर इज ऑलवेज सायकॉलॉजिकल अँड ॲक्ट इज ऑलवेज फिजिकल अँड देअर इज कॉन्स्टन्ट कंट्रोल ऑफ मेंदूजं बौद्धिक वाढ'' असं सांगून डॉक्टरनी त्यांना खजुराहोला मुद्दाम सेकंड हनीमूनसाठी जा असं सुचवलेलं असतं. डॉक्टर शहांकडच्या ट्रीटमेंटने फायदा होत नाही तेव्हा डॉ. गुणेच ओव्हम मॉनिटर करून इनसेमिनेशनची ट्रीटमेंट सुरू करण्याचा सल्ला देतात. त्या सगळ्या सव्यापसव्याची घृणा अनयच्या मनात एकटवते. सीमेन कुठे गोळा करायचे - या विचारानेही त्याची धुसपूस चालते. पुरुष म्हणून आपलं अस्तित्व राहिलंय की नाही या शंकेनं त्याच्या शरीराची आग होत राहते. आपला पुरुषीपणा सिद्ध करायची त्याची धडपड पाहून सुकन्या त्याला समजावते, ''तुला तू कसा आहेस ते माहीत नाही? इतके का रे तुम्ही पुरुष हळवे, अगदीच मऊ असता त्यासंबंधी? सदैव तत्पर, सदैव सक्षम असणारी मशीन्स आहात का तुम्ही? हा ठरीव प्रकार तुझ्या तिटकाऱ्याचा असेल म्हणून घडत असेल तसं एखाद्या वेळी... तू असं स्वतःला कसोटीवर लावणं सोडून दे. झोप आता. माझी अपेक्षा पुरवणं वगैरे विचार सोडून दे.'' इम्पोटन्सीच्या अभद्र शंकेतून अनय बाहेर पडतो. (७३)

...पुढे डॉक्टर गुणेच त्यांना सल्ला देतात, ''ही सगळी ट्रीटमेंट आपण थांबवू या. नियतीच्या इच्छेवर भिस्त ठेवू या.''

–आणि सुकन्याची पाळी चुकते. डॉ. त्रिवेदींकडे युरीन टेस्टसाठी सँपल देण्यात येते. डॉ. गुणे रिपोर्ट पाहून काँग्रॅट्स देतात. सोनोग्राफीच्या वेळी डॉ. वाठारे अनयलाही आत बोलावून मॉनिटरवर ''सहा एम एम आकाराचं - नखाएवढं'' बाळ दाखवतात. कॉर्डिॲक ॲक्टिव्हिटी चांगली आहे. इतर सगळं ठीक आहे असंही सांगतात. अनयला खात्री असते - यावेळीही मुलगीच होणार. सिद्धीच परत पूर्ण आयुष्य जगायला येणार.'' (८५) सुकन्या म्हणते, ''मलाही ती परत हवीय. या जन्मी तिचे सर्व लाडकोड पुरवू. नाच, चित्रकला, बागकाम सगळं शिकवू. फुलासारखं जपून मोठी करू...''

सुकन्या आपल्या गर्भारपणात सर्व दृष्टींनी सावधगिरी घेते. नियमित सोनोग्राफी, सघन सात्त्विक आहार, उकळलेलं पाणी, व्यवस्थित औषधोपचार -

...तरीही अधूनमधून मानसिक ताण वाढवणारे प्रसंग येतातच. ''गर्भाची वाढ मंदगतीने होतेय - वजन हवं तसं वाढत नाही'' असं डॉक्टर सांगतात. सुकन्याची अन्नावरची वासना उडते. अनय तिला धारेवर धरतो, ''खावंस न वाटणं - अनिच्छा - गेलं जहन्नममें. डॉक्टरांनी सांगितलेलं सगळं खाल्लंच पाहिजे. नेमून दिलेलं खाल्लं अन तरीही भूक राहिली तरच तुमचे ते डोहाळे, चोचले वगैरे...'' अशी त्याची समजूत काढायची रांगडी, पुरुषी पद्धत. वत्सल मायेची ती पद्धत नव्हती. तो तिच्या खाण्याचं टाइमटेबलच तयार करून देतो. दर वीस मिनिटांनी तिनं काहातरी खायलाच हवं... ''तुझं पोट म्हणजे जिवंत इनक्युबेटर समज. बाळाला पोसणारं... हा एक प्रोजेक्ट चालू आहे, अन तू त्यातलं महत्त्वाचं साधन आहेस असं समज. तुझं काम तू चोख पाडायला पाहिजे. जीवन सार्थ किंवा व्यर्थ ठरवणारं हे एक मिशन आहे आपल्या दोघांचं. त्यात आवडनिवड, चवढव काहीही आड यायला नाही पाहिजे...''

...अमृत नर्सिंग होममध्ये सुकन्या दाखल होते. सिझेरियनची तयारी होते. ऑपरेशन थिएटरमध्ये तिला नेण्यात येते. बाहेर बसलेल्या अनयच्या मनात प्रचंड कोलाहल माजते.

–आतून बाळाच्या किंकाळीचा आवाज येतो. अनयच्या अंगावर काटा फुलतो.

दादा हसत बाहेर येतात. मुलगी असं सांगतात. हिप हिप हुर्ये हुर्येची आरोळी ठोकून अनयला घुसळून काढतात. बेबी नॉर्मल आहे... वजन चोवीससे ग्रॅम...

अनय खुशीत येतो. थँक गॉड. जिंकलो. तपश्चर्या फळाला आली. अहोरात्र काळजी घेतली त्याचं सार्थक झालं. ''असं वाटत असतानाच चिमणे, सोप्या कुशीची हो पोरी'' असा बापाचा पहिलाच आशीर्वादाचा शब्द मनोमन उमटतो.

...संजोग वीरकर यांची ही पहिलीच कादंबरी. परंतु आकृतिबंध व शैली या दोन्ही दृष्टींनी नवखेपणाच्या कुठल्याही खुणा तिच्यात जाणवत नाहीत. वैद्यकीय तपशील तिच्यात येतात. पण ते संभाषणाच्या ओघात. कादंबरीची सुरुवात होते ती सिद्धीच्या निधनाच्या वर्षश्राद्धाला. त्या निधनाचा धक्का अजूनही कायम आहे. त्या तिरीमिरीत मृत्यूनंतरच्या देहदानाचा संकल्प करायचा विचार येतो. त्यासाठी लागणारा फॉर्म भरायला प्रा. भोळ्यांकडे अनय जातो. ते त्याला म्हणतात, ''फारच जखमी झालास रे तू. एक गोष्ट कर. मनातली ही सगळी मळमळ, दु:ख तू कागदावर मोकळं कर. ..हळूहळू दु:खाचा निचरा होईल... तोही मन:शांतीचा एक उपाय आहे.''

–आणि सिद्धीचं स्मारक म्हणून लिहायचं असं तो ठरवतो. ऐपतीत बसेल असं हे स्मारक... या विचारानं हसू फुटतं. हास्यास्पदही वाटतं.

अधूनमधून त्या दैनंदिनीतले उतारे आणि सद्य:घटना यांचा मेळ घालत सिद्धीच्या जन्माची आणि मरणाची कहाणी आपल्यापुढे उलगडत जाते; तशीच सिद्धीनंतर मूल व्हावे यासाठी केलेल्या वैद्यकीय उपायांची वैविध्यपूर्ण झलकही ती पेश करते. या दांपत्यातील प्रेम, एकमेकांना समजून घेण्याची व फुलवण्याची क्षमता, शृंगाराच्या तऱ्हा यातून एका प्रगल्भ, समर्पित नात्याच्या हृदयंगम पट उलगड़ला जातो. एकूणच या नाजूक विषयाची हाताळणी योग्य त्या गांभीर्याने होते. त्यामुळे हा अनुभव आपल्याही मनाचा भाग बनून जातो. हे यश काही अल्पस्वल्प नव्हे.

***मूल, पृष्ठे १६४, नव्वद रुपये***


**कथा, कादंबरी, क्रीडा, विज्ञान अशा विविध विषयांवरील दर्जेदार पुस्तके मिळण्याचे एकमेव ठिकाण**

**मॅजेस्टिक एजन्सीज्**

छबिलदास रोड, दादर (पश्चिम), मुंबई - २८.
फोन - ४३०२१२६




## मूल...... एक झलक...

*''खरंय! तुम्ही पुरुषांनी आमची कितीही बरोबरी केली तरी तुम्हाला हा अनुभव, हे भाग्य लाभणार नाही. एका जीवाची निर्मिती करायचं. आपल्या शरीरातून दुसऱ्या शरीराला पोसवून, वाढवून जन्म द्यायचं. आपण स्वतः एक नसून दोन आहोत ही भावनाच इतकी थ्रिलींग आणि अतिरम्य असते की बस्स! ते दुसऱ्या जीवाचं आपल्यात उमटणं, उमलणं, फुलणं यू विल नेव्हर एक्सपिरियन्स. अगदी पृथ्वी जिंकून टाचेखाली ठेवणाऱ्या अतिसामर्थ्यशाली सम्राटालाही ते भाग्य कदापि लाभणार नाही. पण एका अतिक्षुद्र स्त्रीला ते सहज लाभेल. यातला नाटकी भाग जाऊ दे अनय. पण जन्म तोलावा असा हा अनुभव असतो रे. तुला मिळायला हवा होता!'' अनयला क्षणभर तिच्या या बोलण्याची यथेच्छ टिंगलटवाळी करायचा मोह झाला. पण आतून निरांजन लावल्यासारखा तिचा उजळलेला चेहरा आणि त्यावर प्रतीत झालेली प्रामाणिक अनुभूती पाहून त्यालाही त्या स्वप्नात आपण प्रामाणिक साथ द्यावी असं वाटू लागलं.*

*'स्त्रीचं अवघं अस्तित्व आई होऊन सिद्ध होतं म्हणून म्हण, किंवा आपल्यातल्या वात्सल्यानं आपल्या अंशाला न्हाऊ घालायची अनावर उर्मी असते स्त्रीमध्ये म्हणून म्हण; पण प्रत्येक स्त्रीला आई होण्यात जन्मसार्थकता वाटते एवढं खरं.'' एकटक बघत पण कुठेच न पाहत सुकन्या म्हणाली -*

*''तुला माहितेय, मी कथात तरी वाचलंय की देवाला प्रत्येक घरात एकाच वेळी असणं शक्य नव्हतं म्हणून त्याने मातेची निर्मिती केली ते.'' अनयनं तिला विचारल्यावर तिनं कोपरापासून वायपरसारखा हात हलवत हावभावानंच नाही म्हणून सांगितलं. मग शब्द विचारपूर्वक शोधत, नजर विचारात रोखत मघाच्याच म्हणण्याचा पुढील भाग स्वगतासारखा प्रकट करत म्हणाली -*

*''एखाद्या एका अस्तित्वानं सर्वस्व समर्पणातून अर्पण झालेलं काही फुलवून, पूर्ण विकसित करून एकातून दोनत्व पावणं हा आयुष्याच्या परिपूर्तीचा अनुभव आहे. इतका की भले भले ज्ञानी म्हणतात की स्त्रीचं खरं प्रेम फक्त आपल्या अपत्यावरच असतं. स्त्री पतीला फक्त एक साधन मानते बीजासाठी अत्यावश्यक असणारं आणि जमलंच तर उदरनिर्वाहासाठी. पण ते दुय्यम!''*

*''संस्कृतीच्या आरंभ काळात तर तेवढंही महत्व नव्हतं पुरुषाला! तो फक्त अंतराळात फिरणाऱ्या आत्म्यांना आत शिरून वाढण्यासाठी; स्त्रीच्या ओटीपोटीची वाट मोठी करून देणारं उपयोगी उपकरण इतपतच महत्त्वाचा होता.'' अनयनं र. धो. कर्व्यांनी अनुवादित केलेल्या 'असंस्कृत समाजातील लैंगिक जीवन.' या पुस्तकातला हा संदर्भ सहज आठवला म्हणून तिला सांगितला.*

## नवऱ्याने टाकलेल्या परित्यक्तांची जीवघेणी ससेहोलपट कशी थांबणार?

# परित्यक्ता

**डॉ. लीला पाटील**

महाराष्ट्रात सुमारे सहा लाख स्त्रिया अशा आहेत की ज्यांना नवऱ्याने टाकले आहे किंवा ज्यांनी नवऱ्यांना टाकले आहे; आणि ज्यांना सासरचा किंवा माहेरचा आधार नाही; ज्यांना परित्यक्ता असे म्हणता येईल. या परित्यक्तांना वैवाहिक जीवनातल्या सौख्याचा व सुरक्षिततेचा लाभ तर होत नाहीच, उलट कुंकवाचा सौभाग्यटिळाही लावावा लागतो. कुंकू हे त्यांच्या वांझ सौभाग्याचे आणि अवहेलनेचे प्रतीक असते. नवऱ्याने टाकले; ते का टाकले? या प्रश्नाची उत्तरे प्रत्येक परित्यक्तेच्या बाबतीत वेगळी मिळतील. परंतु एवढे खरे की लग्नबंधनातून त्या मुक्तही झालेल्या नसतात आणि वैवाहिक पत्नीचा दर्जाही त्यांना उरलेला नसतो. परित्यक्ता त्यामुळे दुहेरी कुचंबणेला तोंड देत असतात. अशा या परित्यक्तांना एकत्र आणून त्यांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न काही संघटना व संस्था करीत आहेत.

डॉ. लीला पाटील यांनी अशा अनेक परित्यक्तांना भेटून त्यांच्याशी मोकळेपणाने बोलून त्यांच्या व्यथावेदना जाणून घेतल्या. त्यांच्या समस्या समजावून घेतल्या. त्या शब्दांकित केल्या. या पुस्तकात त्यापैकी निवडक अशा तेवीस स्त्रियांच्या करुण-कठोर ससेहोलपटीचा मागोवा घेतलेला आहे. एक सामाजिक दस्तऐवज म्हणून या पुस्तकाचे मोल मोठे आहे.

'उष्टावलेली स्त्री परित्यक्ता' या आरंभीच्या लेखात डॉ. लीला पाटील यांनी अनेक महत्त्वाचे मुद्दे उपस्थित केले आहेत.

१) कायद्याने संमती नसलेला, पण स्वयंनिर्णयाने केलेला लग्नविच्छेद. अशा वेळी नवऱ्याला व पत्नीला टाकून देताना त्यांच्या संमतीचा विचार करण्याएवढी उसंत दाखवली जात नाही. मने फाटली, सहवास त्रासदायक वाटू लागला की कोणीतरी घराबाहेर पडते; वा घराबाहेर पडण्यास भाग पाडले जाते.





२) हा प्रश्न दोघांपुरताच मर्यादित नसतो. मुले, कुटुंबसंस्था व इतर जाती, मालमत्ता वाटणी, मुलांचा संपत्तीतील वाटा इ. प्रश्न उद्भवतात. हा एक सामाजिक प्रश्न ठरतो.

३) पत्नीचा मानसिक व शारीरिक छळ करून तिला पतीचे घर सोडण्यास भाग पाडले जाते. अशा स्त्रीचाही परित्यक्ता म्हणून उल्लेख करायला हवा. शरीराने नसली तरी मनाने ती परित्यक्ता असते. नकोशी झालेली असते.

४) परित्यक्तेला लग्नविच्छेद घेण्याची कायद्याने मोकळीक असली तरी तो मिळवण्यासाठी येणारा न्यायालयीन खर्च व व्याप तिच्या आटोक्यात असतोच असे नाही. नातलगांचीही या कामी मदत मिळतेच असे नाही. त्यामुळे लग्नविच्छेद कायद्याने मिळवण्याबाबत ती चालढकल करीत राहते.

५) घटस्फोटानंतर उष्टावलेली स्त्री म्हणून पुरुष तिच्याशी लग्नाला उत्सुक नसतात. विवाहाच्या अप्रिय छळवादी अनुभवातून गेल्याने अशा स्त्रियाही पुन्हा त्याच छळाच्या प्रक्रियेतून पुन्हा जावे लागेल की काय अशा धास्तीने पुन्हा लग्न करायचे टाळतात.

६) नवऱ्याने त्याग केलेल्या स्त्रीची सर्व बाजूंनी बाई म्हणून कुचंबणा होते. ती अर्थार्जन करून स्वावलंबी जीवन जगू शकली तर तिचा निभाव लागतो. एरव्ही अनैतिक मार्गाकडेही जाऊ शकते. कोणातरी पुरुषाचा आधारही ती शोधते. तो विवाहित वा संधिसाधू असला तर आणखी नव्या समस्या निर्माण होतात.

७) नवऱ्याचे घर सोडल्यावर राहायचे कुठे हा प्रश्नही जटिल ठरतो. महिलाश्रमासारख्या संस्था फार थोड्या आहेत.

८) हुंडा, मानपान, देणीघेणी, करणी याबाबतचे आग्रह, व्यभिचार वा व्यभिचाराचा संशय, व्यसनाधीनता, वेड, अनारोग्य, फसवणूक, नवऱ्याची बेभरवशाची अर्थार्जनक्षमता, शारीरिक संबंधाबाबतचा दोघांमधील बेबनाव, परस्परांना दोष देण्याची वा अपमानित करण्याची खोड, सासर-माहेर यातील जीवनशैली, संस्कृती व आर्थिक स्थिती यातील तफावत, जीवनाबद्दलच्या दोघांमधील भिन्न कल्पना, काहीसा बालिश भाबडेपणा, स्वप्नाळूपणा, कथाकादंबऱ्या-चित्रपट यातून प्रेम-लग्न-संसार याबद्दल मनात रुजलेल्या भ्रामक समजुती, वयोमानातील फरक, शिक्षणातील तफावत, विवाहपूर्व संबंध वा प्रेमभंग, अशा अनेक कारणांमुळे दोघांमध्ये संघर्ष माजू शकतो. त्यात कोणाही एकाची सहनशक्ती संपुष्टात आली की घराचे घरपणच संपुष्टात

येते. रोज वाद, भांडणे, टोचून बोलणे, अपमान, अवहेलना आणि पुढे शारीरिक मारहाण इ. प्रकार वाढत जाऊन एकत्र राहणेच अशक्य ठरते.

९) परित्यक्तांची मुख्य समस्या आर्थिक स्थैर्याची व सुरक्षिततेची असते. स्वत:चे घर असणे, खाण्यापिण्याची ददात नसणे, नोकरी वा कामधंदा करून आत्मसन्मानाने जगता येणे यांचबरोबर जिव्हाळ्याची माणसे जवळ असणे, एकटे राहताना पुरुषांच्या कामुक आवाहनापासून बचाव होणे हेही आवश्यक असते. घटस्फोटानंतरही स्त्रियांचे योग्य ते पुनर्वसन होणे सुलभ व्हावे.

१०) पुन्हा लग्न करायचे असेल त्यांनाही तशी मुभा असते. समंजसपणे त्यांचा स्वीकार करण्याची तयारी असणारे समंजस जोडीदार भेटायला हवेत.

११) ज्यांना पुन्हा लग्न करायचे नाही त्यांना स्वावलंबी जीवन जगता यावे अशी सामाजिक संस्थात्मक व्यवस्था व सुविधा हवी.

१२) लग्न हे मानवी बंधन आहे. निष्प्रेम, बळजबरीचे जीवन जगण्यातील फोलपणाही लक्षात घ्यावा. स्त्रीने केवळ पुरुषाधीन व पुरुषावलंबी न राहाता, स्वतंत्र स्वावलंबी जगण्याचा तिचा हक्क स्वीकारला गेला पाहिजे.

१३) कायदेशीर वा स्वनिर्णित लग्न विच्छेदन यातून निर्माण झालेल्या परित्यक्तांचा प्रश्न अपरिहार्य मानून समाजाने तो सोडवण्याची जबाबदारी घ्यायला हवी.

१४) परित्यक्ता हा शब्द अवमानकारक आहे. त्याऐवजी दुसरा शब्दही वापवणे योग्य ठरेल.

अशी भूमिका प्रथमच स्पष्ट करून पुढे निरनिराळ्या परित्यक्तांच्या जीवनकहाण्या सादर केल्या आहेत. एका दृष्टीने या केस स्टडीज् आहेत. अनेक बारीक सारीक तपशील त्यात येतात; मानवी स्वभावाचे वेगवेगळे नमुने भेटतात. प्रत्येक स्त्रीचा प्रश्न वेगळा आहे; पण संघर्ष अटळ झाला की घरातून तिलाच बाहेर पडावे लागते. तिचा दोष असतोच असे नाही. पण तिलाच सर्वात जास्त त्रास सोसावा लागतो.

यशोदा बुद्धिमान, हुशार, वाचनवेडी, सुगरण. विजय उमदा, खेळकर, बलवान, चेष्टामस्करी करण्यात आनंद मानणारा. पण त्याच्या आत्यंतिक कामवासनेपुढे यशोदाचे पार चिपाड होऊन जाते. डॉक्टरी सल्ल्याने ती माहेरी जाते. पण तेथेही विजयच्या फेऱ्या सुरूच. तिची तब्येत नाजूक. त्यातून त्रागा, चिडचिड, भांडणे. चार वेळा गर्भपात. सिगारेटचे चटके, मारहाण. तिच्या शरीराचा खुळखुळा. त्याच्याबरोबर राहणे म्हणजे नरकवास. ती मग माहेरीच राहते. प्रौढ शिक्षणवर्ग चालवून कमाई करते. माहेरचा आधार आहे. तिचे बरे चालले आहे. तीन वर्षे स्वतंत्र राहिल्याशिवाय तिला घटस्फोट मिळू शकत नाही. तिचे मंगळसूत्र कायम आहे.



सुवर्णाला तिची सासू व नवरा बाजीराव छळतात. बाजीराव हा शेळपट, षंढ. ती स्वत:ची वैद्यकीय तपासणी करून घेते. बाजीराव मात्र तपासणीला नकार देतो. दोन वर्षे लग्नाला होऊनही मूल होत नाही, सासू सारखी तिलाच दोष देत राहते. बाजीराव दारू पिऊन घरी गोंधळ घालतो. तिला मारहाण करतो. सासू बाहेरख्यालीपणाचा आरोप सुनेवर करते. उकळत्या तेलातून रुपाया काढायला सांगते. ती चकार शब्द फुटू न देता ते दिव्यही करते. बोटे भाजतात. डॉक्टरांना ती पापड तळताना कढई उलटली असे सांगते. तशात तिची पाळी चुकते. सासू पुन्हा तिच्यावर संशय घेते. हैराण करते. तिला मुलगा होतो तो थेट सासरे आबा यांच्यासारखा. बाजीराव तिला आणखीच दूषणे देतो. तू माझ्या बापाबरोबर झोपलीस असे सांगून तिचा छळ करतो. शेवटी ती माहेरी येते. बाजीराव एका विधवा बाईला रखेली म्हणून शेतावर आणून ठेवतो. शिक्षण नसलेली सुवर्णा, पुढे काय हा प्रश्न चोवीस तास मनात घोळवत जगते.

लक्ष्मीचा चुलत दीर तिच्या संसाराची वाट लावतो. तिला शेतात एकटी गाठून नासवतो. ती त्याबद्दल नवऱ्याला सांगते; पण नवरा तिलाच घरातून बाहेर काढतो.

हुंडा कमी म्हणून कल्पनाची सासू तिचा छळ आरंभते. तिची सासूच आपल्या मुलाला (कल्पनाच्या नवऱ्याला) झोपेची गोळी देऊन रोज रात्री शारीरिक संबंधापासून दूर ठेवते. सासू त्याला झोपेची गोळी देते हे लक्षात आल्यावर कल्पना संतापते. पण सासू तिला ते सुख मिळू नये म्हणून सतत प्रयत्न करते. तिला हिस्टेरियाचे झटके येऊ लागतात. झोपेच्या गोळ्या घेऊन ती आत्महत्येचा प्रयत्न करते. सासू एकदा लोखंडी उलथण्याने तिच्या ओठाला चटके देते. ती माहेरी येते. सध्या मुंबईत ती एका मोठ्या हॉटेलात स्वागतिका म्हणून काम करतेय. मंगळसूत्र घालत नाही.

अरुंधतीचा नवरा अरुण प्रिया नावाच्या मैत्रिणीत गुंतत जातो; अरुंधती त्याला त्याबद्दल विचारते. तो तिला मारहाण करतो. ती घर सोडायचे ठरवते. पण ते घर सुदैवाने तिच्याच नावावर असते. अरुणला बाहेर पडावे लागते. तिची मुलगी मनीषा ही मात्र लहान वयात या प्रसंगातून गेल्याने मानसिक दृष्ट्या डिप्रेशनमध्ये जाते. तिची सासूही अपंग व मनोरुग्ण बनते. आपले दागिने विकून अरुंधती दिवस काढते आहे. अरुण व प्रिया मात्र आरामात जगत आहेत. अरुंधतीला दिवसभर वेडसर सासू व मुलगी यांना सांभाळत घरात बसून राहावे लागत आहे.

नवराबायको दोघेही डॉक्टर. अनिकेत गर्भजल परीक्षा करून मुलींचे गर्भ पाडून भरपूर पैसा मिळवतो. नर्सबरोबर शारीरिक संबंध ठेवतो. तिच्याबरोबर परगावी हिंडतो. डॉ. अनघा त्याबद्दल विचारते; तर तो आपली चूक कबूल करतो. पण त्याचे मद्यपान वाढत जाते. वैद्यकीय कामात हेळसांड होत जाते. नर्सबरोबरचे लफडे चालूच राहते. शेवटी अनघा माहेर गाठते. स्वत:चे क्लिनिक काढते. स्वतंत्रपणे जगते. नवऱ्याची धमक्या देणारी गलिच्छ भाषेतली पत्रे

येत असतात. फोन येत राहतात. ती पोलिसांकडून संरक्षण मागते. मुलगा अमित आठ वर्षांचा आहे. तो मात्र तिच्याजवळ आहे. पण त्याला कधी तो पळवून नेईल याचे भय तिच्या मनात सतत असते.

–अशी ही प्रत्येकीची वेगळी कहाणी आहे. पण शेवट एकच आहे. परित्यक्ता म्हणून जगण्याचा शाप.

*परित्यक्ता, पृष्ठे १२३, सत्तर रुपये*

---




## जपानने जगभर लोकप्रिय झालेली वामनवृक्ष कला

# बोन्साय

**आ. बा. पाटील**

बोन्साय म्हणजे बुटकी झाडे. वडाचे झाड एरव्ही किती प्रचंड. पण आपल्या घरातल्या डायनिंग टेबलवर फ्लॉवरपॉटमध्ये राहू शकेल असे छोटे वडाचे झाड (बोन्साय) तयार करता येते; आणि वटसावित्रीच्या दिवशी वडाची पूजा करण्यासाठी बाहेर जायची मग गरजही पडत नाही. चिनी लोकांनी शोधलेल्या आणि जपानी लोकांनी वाढवलेल्या या वामनवृक्षकलेमुळे कुठलेही झाड आपण घरात, परसात वा बाल्कनीत ठेवू शकतो. बोन्साय म्हणजे मूळ झाडाची छोटी प्रतिकृती नव्हे, तर मूळ झाडच. नैसर्गिक मोठ्या झाडाइतकेच जातिवंत, नैसर्गिक आणि तजेलदार.

बोन्साय ही वामनवृक्ष कला म्हणजे एक जिवंत कला आहे. चित्रकला, शिल्पकला याद्वारे ज्या कलाकृती निर्माण होतात त्या एका अर्थाने निर्जीव कलाकृती असतात. त्या सुंदर असल्या तरी एकदा घडल्या – बनल्या तशाच कायम राहतात. बोन्साय झाड हे मात्र जिवंत असते. ते वाढत असते. त्याच्या मूळ रूपात बदल करता येतो. अधिक आकर्षकपणा आणता येतो. त्याला फळेही येतात; तीही मूळ मोठ्या फळाप्रमाणेच चवदार असतात. ही कलाही



पुष्पमांडणीसारखी आहे. बोन्सायच्या अवतीभोवती दगडगोटे वा कृत्रिम धबधबे सोडून जपानी मिनी बागही करता येते.

बोन्सायची माहिती देणारी पुस्तके मराठीत दुर्मिळच आहेत. 'सुंदर माझी फुलबाग' आणि 'सुंदर माझी फळबाग' या पुस्तकांचे निर्माते आ. बा. पाटील यांनी 'बोन्साय'ची सर्वांगीण माहिती देणारे बोन्साय हे पुस्तक आता तयार केले आहे.

बोन्साय हा शब्द दोन जपानी शब्दांपासून बनला आहे. बोन म्हणजे उथळ भांडे किंवा तबला आणि साय म्हणजे रोप किंवा रोप लावणे. परंतु दोन्ही शब्दांचा एकत्र अर्थ मात्र वामनवृक्ष असा होतो. उथळ भांड्यात लावलेले रोप असे म्हणता येईल. पण बोन्साय हे झाड आता कुंडीत वा जमिनीत कुठेही लावता येते.

बोन्साय झाड हंगामाप्रमाणे वा वाढत्या वयाप्रमाणे बदलते. ते पूर्ण कधीच नसते. ह्या झाडाच्या निर्मितीसाठीही चित्रकाराप्रमाणे किंवा शिल्पकाराप्रमाणे कलात्मक दृष्टी लागते. बोन्सायमध्ये ९० टक्के कला असते. १० टक्के वृक्षसंगोपन असते. असे म्हटले तर ते रास्तच ठरेल. कला व वृक्षसंगोपन या दोन्ही गोष्टी परस्परपूरक आहेत. तेराव्या शतकापासून चीनमध्ये बोन्साय झाडे आढळतात. जपानमध्ये अठराव्या शतकात तिचा विशेष बोलबाला झाला, प्रसार झाला. आज ती जपानची कला म्हणूनच गणली जाते. गेल्या शंभरेक वर्षात ही कला सर्वत्र गेली. परंतु ही मूळ भारतीय कला आहे असेही म्हटले जाते. भांड्यात झाडे लावण्याची कला भारताकडून चीनमध्ये गेली. चीनकडून जपानकडे. एकेकाळी चिनी संस्कृतीचा जपानवर पगडा होता. त्यामुळे चीनचे जे काही असेल ते जपानमध्ये आदर्श मानले जाई.

जपानने जोपासलेल्या या कलेची यूरोप, अमेरिका, ऑस्ट्रेलिया यातील अनेक वृक्षप्रेमींना भूल पडली. त्यांनी आपल्याकडेही जपानमधून बोन्सायसाठी लागणारी भांडी, हत्यारे, उपकरणे आयात केली; आणि आपल्याकडील झाडांवर प्रयोग सुरू केले. निसर्गाचे अवलोकन करूनच बोन्सायच्या विविध प्रकारे रचना करण्याच्या कल्पना सुचतात. बोन्सायसाठी मेंदी, बांबू, पिंपल, तुळस, कढीपत्ता, बाभूळ, तगर, चमेली, सोनचाफा, पळस, कण्हेर, बुच इत्यादी झाडे तिकडे विशेष वापरात आणली जातात. या झाडांचा बुंधा जाड व मजबूत असावा लागतो. फांद्यांची रचना चांगली असावी लागते. पाने, फुले आणि फळेही लहान आकाराची असणे इष्ट असते. केळी, पपई, नारळ, पाम ही झाडे बोन्सायसाठी वापरली जात नाहीत कारण त्यांचा बुंधा तंतुमय असतो; तो कमजोर असतो. वर्षभर भरपूर पाने–फुले असणारी झाडे–झुडपे बोन्सायसाठी निवडावी. चेरीसारखे विशिष्ट हंगामात फुलणारे झाड हंगाम संपल्यावर चांगले दिसत नाही. म्हणून तसे झाड निवडणे टाळावे.

आ. बा. पाटील यांनी पुस्तकात बोन्सायबद्दल अत्यंत पद्धतशीर आणि बारीकसारीक

माहिती दिलेली आहे. वाचकांच्या शंकांना वावच राहू नये अशी एकूण प्रकरणांची रचना आहे.

बोन्सायसाठी रोपे कुठून मिळवावी? (नर्सरीतून आणणे, बियांपासून तयार करणे, कटिंगपासून तयार करणे, गुटी कलम, भेट कलम, जंगलातून मिळवणे.)

बोन्सायची भांडी कशी असावीत? त्यांचे डिझाइन, रंग, आकार कसे असावे?

बोन्सायसाठी माती कुठली घ्यावी?

बोन्सायसाठी लागणारे इतर साहित्य काय लागते? (धारदार कात्री, मुळ्या मोकळ्या करण्यासाठी हूक, धारदार करवत, तांब्याची तार, टोकदार काडी, नायलॉनची जाळी, प्लॅस्टिक टब, झारी, पकड इ.)

बोन्सायच्या झाडांची रचना (स्ट्रक्चर)

बोन्साय भांड्यात लावण्याचे तंत्र (पॉटिंग)

बोन्साय कसे तयार करावे?

बोन्सायची ठेवण वा शैली.

बोन्सायला आवश्यक अन्नघटक, खते.

बोन्सायवरील कीड (वाळवी, खवले कीड, तुडतुडे, पिठ्या कीड, लाल कोळी)

बोन्सायचे रोग (भुरी, करपा)

भांडे कसे बदलावे (रि-पॉटिंग)

बोन्सायच्या खास पद्धती (खडकावर बोन्साय, खडकांवर मुळे असणारे बोन्साय, बोन्सायचे अरण्य, जिवंत निसर्गदृश्य)

बोन्साय झाडे कुठे ठेवावी? कशी ठेवावी? किती उंचीवर ठेवावी?


बोन्सायसाठी उपयुक्त झाडे (पानांसाठी बोन्साय, फुलांसाठी बोन्साय, फळांसाठी बोन्साय)

ही सगळी माहिती नजरेखालून घातल्यावर कलाप्रेमी वाचकांचे हात बोन्सायच्या आल्हाददायक स्पर्शासाठी सळसळू लागतील यात काय शंका?

भरपूर आकृत्यांद्वारे प्रत्येक बाबीचे स्पष्टीकरण केले आहे. रंगीत आर्टप्लेट्सवर मल्टिपल खोड, उलटी केरसुणी शैली रचना, खडकावरील बोन्साय, फुकियन ट्री, कॉर्पिनस-हॉर्नबीम, बांबू, बेतुलताना, जपानी मॅपल, चिनी पी ट्री, बेतुल पेंडुला, ट्रायडेंट मॅपल यांचे आकर्षक नमुनेही दिले आहेत. त्यामुळेही बोन्सायबद्दलच्या आत्मीयतेत भर पडेल.

***बोन्साय, पृष्ठे ११६, पंचाहत्तर रुपये***






**एव्हरेस्ट बेस कँपपर्यंतच्या गिर्यारोहणाची रोचक हकीकत**

# *हिमकोंदणातील हिरा*

**सूर्यकांत कुलकर्णी**

नुकतेच पुण्याचे एक गिर्यारोहणपटू सुरेंद्र चव्हाण जगातील सर्वोच्च शिखर माउंट एव्हरेस्ट सर करून आल्याने हिमालय भ्रमणाची चर्चा जोरात आहे.

सूर्यकांत कुलकर्णी हे पुणे विद्युत मंडळाच्या रिक्रिएशन क्लबच्या सात सदस्यांच्या समवेत एव्हरेस्ट बेस कॅम्पपर्यंत जाण्याच्या मोहिमेत १९९४ साली सहभागी झाले. तसा ट्रेकिंगचा किंवा गिर्यारोहणाचा पूर्वानुभव त्यांना नव्हता; परंतु 'मनी धरावे ते होते। विघ्न अवघेचि नासून जाते। कृपा केलिया रघुनाथें प्रचीत येते' ही समर्थ रामदासांची ओवी वाचनात आली आणि या मोहिमेत त्यांनी स्वतःलाही झोकून दिले. अडीअडचणींना तोंड देत दिनांक १७ एप्रिल १९९४ रोजी या पथकाने पुणे सोडले आणि काठमांडू गाठले. दि. २३ला लुक्लापासून मोहिम सुरू झाली. फॅकदीम, नामचे बजार, खुमजुंग, फेरीचे, लोंबुचे, गोरक्षेप, काळा पठार पार करुन पुढे बेस कँपचा टप्पा गाठतात. काला पत्थरची उंची १८१९२ फूट आहे. तेथून बेस कँपवर जाऊन एव्हरेस्टचे दर्शन घेऊन परत फिरायचे असा या मोहिमेचा उद्देश होता. त्याप्रमाणे मोहिमेतील सदस्य दिनांक ३ मे १९९४ रोजी काळा पठारवर पोचतात; पुढचे अनामिक शिखर गाठतात आणि परत फिरतात.

काळ्या पठाराचे गोरक्षेपवरून दिसणारे टोक हे शेवटचे नसते; त्याला वळसा घालून पुढे गेल्यावर परत उंच पठार येते. ते मोठी दमछाक करते. जबरदस्त थकवा आल्याने येथूनच परत फिरावे असे वाटू लागते; पण इतर मंडळी येईपर्यंत चढता येईल तेवढे चढून जाऊ म्हणून एकेक पाऊल सूर्यकांत कुलकर्णी पुढे टाकतात; आणि शेवटच्या उंच टोकावर अखेर पोचतात. सुसाट वारा. दगडांचा आधार घेऊन ते उभे राहतात. एका दगडावर बसून एव्हरेस्टचे दर्शन घेतात. एव्हरेस्ट हे सर्वोच्च शिखर. पण त्यावर हिम नसते. त्यांना आश्चर्य वाटते. हिमशिखरांच्या

रांगेत हा हिमकोंदणातला हिरा शोभून दिसतो. एव्हरेस्टच्या एका बाजूने चोला पासून खुंबुटसे ते थेट प्युमोरीपर्यंत हिमशिखरांची एक वलयांकित रांग जाते, आणि दुसऱ्या बाजूने नुत्से-लुत्सेपासून आबाद आलम थॅमसेस्कू हिमशिखरांची रांग जाते. सर्वोच्च अर्थातच सागरमाथा – एव्हरेस्ट. दुपारी पावणेदोन वाजता अठरा हजारावर फूट उंच असणाऱ्या या शिखरावर पोचल्यावर, इतरही मंडळी येतात. डॉक्टर मुकुंद भालेराव तेथे गगनगिरी महाराजांचा फोटो ठेवतात. वाऱ्याच्या सपक्यामुळे तेथे जास्त बसणे शक्य नसते. कड्याच्या आडोशाला बसून एव्हरेस्टकडे टक लावून बघताना 'हा आपल्या आयुष्यातील सर्वात भाग्याचा क्षण' असा आनंद मनात दाटून येतो. दहाबारा दिवसातील वाटचालीची क्षणचित्रे मन:पटलापुढून चमकून जातात. सहकाऱ्यांचे चेहरे समोर येतात.

- नामचेचा चढ, थँगबुचेचा उतारा. मुक्कामावर स्वागत करणारा किशोर.
- फुंगीतांगा इथे नदीत आंघोळ करताना पाठ घासणारे मोरे.
- झुलत्या पुलावर उडालेली त्रेधातिरपीट पाहून योग्य टेकनिक सांगणारे चंद्रशेखर सबनीस.
- पहिलंच ट्रेकिंग – तेही एव्हरेस्टला म्हणून कौतुक करून मनोधैर्य वाढवणारे डॉ. मुकुंद भालेराव.
- थकल्यावर थोडं थांबू या म्हणत सतत पाठराखण करणारा राम चव्हाण
- 'मी तुमची सॅक घेऊ का थोडा वेळ?' म्हणून मदत करणारा मानसिंग शिंदे
- कुठल्याही वाटेनं डोंगरावर चढण्याची जिद्द दाखवणारा दीपक कोण्णूर.

या सर्वांमुळेच आपण येथवरची मजल गाठली या विचाराने कुलकर्णींना गदगदून येते.

त्याचवेळी पाऊस सुरू झाल्यासारखे वाटते. हा डोळ्यातल्या अश्रूंचा पाऊस असतो. आनंदाश्रूंचा.

एकमेकांचे अभिनंदन करताना सर्वांचे आवाज भरून येतात. शरीर मोरपिसांसारखे हलके हलके वाटते. मन निर्विकार होते. ईश्वराचा वत्सल हात अंगावरून फिरल्यासारखे शांत शांत वाटते. अर्जुनाला विश्वरूप दर्शन झाले, तसेच हे एव्हरेस्ट दर्शन समाधीसदृश अवस्थेत नेते.

पोर्टर फोटो काढतो. कुलकर्णी यांच्या पत्नीने दिलेल्या मुगाच्या लाडूचा सर्वजण आस्वाद घेतात. गिर्यारोहणाच्या आठवणी निघतात.

त्या बलाढ्य भव्य निसर्गाच्या तुलनेत आपण किती क्षुद्र पालापाचोळ्यासारखे आहोत ते जाणवते.

–आणि परतीच्या मार्गाने उतरण सुरू होते. एकेक पाऊल जड जड वाटते.



भारावल्यासारखे, भान हरपल्यासारखे.

दुपारी साडेचारला गोरक्षेप कँपवर सर्वजण येऊन पोचतात, आणि आपण बारा तास चाललो होतो या जाणिवेने सर्वांनाच थकवा जाणवू लागतो. गुंगी आल्यासारखे होते. थंडी-गारवा-थकवा यामुळे डोके दुखू लागते.

तब्येतीमुळे बेस कॅम्पला जावे की नाही असा प्रश्न पडतो. परंतु कुलकर्णी बेस कँपला जायचे ठरवतात. डाव्या बाजूने पठारावर जाऊन एव्हरेस्ट दर्शन झाले, आता उजव्या बाजूने दर्शन घ्यायचे या विचाराचेही आकर्षण राहते. खुंबू ग्लॅशियर पार करून, बेस कॅम्पपर्यंत मजल मारतात. ग्लॅशियरमुळे एकच एक ठराविक वाट तेथे नाही. कुठली दरड केव्हा कोसळेल याचा नेम नसतोच. बर्फही पडतो. रुळलेली वाट त्यामुळे पुसली जाते. बेस कँपवर अमेरिका, न्यूझीलंड, स्वित्झर्लंड यांचे गिर्यारोहक तंबू टाकून मुक्कामाला आलेले असतात.

येथून एव्हरेस्टच्या चढणीचा आरंभ होतो. तेथून एव्हरेस्टचे दर्शन मात्र होत नाही. ढग जमा होतात. सूर्यकिरणही चंद्रासारखे शीतल वाटू लागतात. गार वाऱ्याचे सपके अंगावर आदळतात. हिमवर्षाव होऊ लागतो. हिमगाराही दाण दाण खाली कोसळतात. परतीची वाट धरणे क्रमप्राप्तच असते. गोरक्षेपला परतेपर्यंत पाच वाजतात. तेथून लोबुचेला जाऊन मुक्काम करायचा. आजही बारा तासांची भ्रमंती झालेली असते. अंधारातून मार्ग काढत लोबुचेला सर्वजण एकत्र येतात.

–अशा एव्हरेस्ट बेस कँपपर्यंतच्या गिर्यारोहणाचा हा वृत्तान्त सूर्यकांत कुलकर्णी यांनी अत्यंत वेधक शैलीत पेश केला आहे. ते काही सराईत लेखक नव्हते; परंतु हे प्रवासवृत्त अगदी रेखीव व शैलीदार उतरले आहे.

प्रवासाची तयारी, सहप्रवाशांच्या स्वभावातले बारकावे, निसर्गाचे विविध विभ्रम, मुक्कामाच्या स्थळांची वर्णने, खाद्यपदार्थांची चव, अंताक्षरी स्पर्धा, वाटेत आलेल्या अडचणी, चिडचिडणं, परदेशी पर्यटकांच्या बिनधास्त प्रतिक्रिया – या सर्वांची यथातथ्य पेशकश होते.

जोकपेपुढे एक तिशीतली फॉरेनची ललना समोरून येते. लेखक तिला सहज विचारतो,

"हॅव यू एन्जॉइड्?"

त्यावर तिचे रोखठोक उत्तर येते, "व्हेन डिड यू स्लीप वुइथ मी?"

काठमांडूला दि. १० मे रोजी पोचल्यावर एक दिवस थांबून गोरखपूरमार्गे पुण्याला दि. १५ रोजी हे सर्व साहसवीर परततात.

एव्हरेस्ट बेस कँप प्रवासासाठी लागणाऱ्या साहित्याची सूची आणि प्रवासदर्शक नकाशे शेवटी दिलेले आहेत. रकसॅक, रेनकोट, कॅरीमॅट, स्लीपिंग बॅग, फेदर जॅकेट, स्नो शूज, ट्रॅक सूट, स्वेटर, हँड ग्लोव्हज्, कॅप, शर्ट, पायमोजे, नी कॅप, मेडिसिन किट, औषधे, कॅमेरा,

दुर्बिण, सुकामेवा, इ. साहित्य बरोबर घ्यावे लागते; नेहमीही यापैकी बरेच साहित्य प्रवासात बरोबर लागतेच.

तरुण वाचकांना हे प्रवासवृत्त प्रेरक वाटेल यात शंका नाही. कुलकर्णी यांनी वयाच्या पंचेचाळिशीत ह्या मोहिमेत भाग घेतला. तोही पूर्वानुभव नसताना. तर युवावर्गाला तेथे जाण्याचा मोह का होऊ नये?

*हिमकोंदणातील हिरा, पृष्ठे १४०, ऐंशी रुपये*

---




**स्वातंत्र्यसंग्रामातील**
**विविध प्रसंग टिपणाऱ्या**
**रोमांचकारक कथा**

# कथा स्वातंत्र्यलढ्याच्या

**मूळ लेखक : आर. के. मूर्ती**
**अनु. : माधव कर्वे**

भारतीय स्वातंत्र्याचे सुवर्णमहोत्सवी वर्ष साजरे झाले. भारतीय स्वातंत्र्याच्या लढ्याचा इतिहास हा रोमहर्षक आणि वैशिष्ट्यपूर्ण आहे. १८५७मध्ये ब्रिटिशांना हुसकावून लावण्यासाठी पहिला सामूहिक प्रयत्न झाला. तो येथील सैनिकांनी केला. परंतु शिपायांचे बंड म्हणून त्याची संभावना केली गेली आणि त्यानंतर ब्रिटिशांनी अधिकच कडकपणे शासनप्रणालीची चिरेबंदी रचना केली. १८८५ साली काँग्रेसची स्थापना झाली आणि सशस्त्र उठावापेक्षा सनदशीर मार्गाने ब्रिटिशांकडून काही हक्क मिळविण्यासाठी संघटित प्रयत्न सुरू झाले. क्रांतिकारकांचा अशा व्यासपीठावरील चर्चांवर आणि भाषणबाजीवर विश्वास नव्हता. त्यांनी ब्रिटिश अधिकाऱ्यांना ठार मारूनच स्वातंत्र्य मिळेल असे मानून दिसेल तेथे बंदुकीच्या गोळ्यांचा वर्षाव केला. महात्मा गांधीजींनी सत्याग्रह, असहकार, कायदेभंग, उपोषण अशा मार्गांचा वापर करून आम जनतेमध्ये स्वातंत्र्याची ओढ निर्माण केली. दांडीयात्रा वगैरे प्रतीकात्मक गोष्टींनीही जगभर वादळ उठवले. हिंदुस्थानातील हिंदू, मुसलमान, शीख, दलित, संस्थानिक वगैरेंनाही ह्या संग्रामात स्वत:चे अस्तित्व दाखवण्याची प्रेरणा झाली; आणि त्या



त्या धर्मांचे व वर्गांचे नेते आपल्या पदरी काय पडते यासाठी जागरूकपणे प्रयत्न करीत राहिले. या सर्वांमध्ये फूट पाडण्याचे, फोडा आणि झोडा नीतीचे धोरण ब्रिटिशांनी कौशल्यपूर्वक राबवले आणि एकमेकांविरुद्ध हे सर्वजण संघर्ष करीत राहतील अशी पावले त्यांनी टाकली. दुसरे महायुद्ध सुरू झाल्यावर ब्रिटनवर बराच त्याचा बोजा पडला, आणि स्वातंत्र्याची मागणी पुढे दामटण्यासाठी हीच योग्य वेळ आहे हे ध्यानात घेऊन महात्माजींनी चलेजावची घोषणा दिली, सुभाषचंद्रांनी ब्रिटिशांच्या हातावर तुरी देऊन जर्मनी-जपानमध्ये जाऊन आझाद हिंद सेनेची स्थापना करून चलेजावचा नारा दिला, मुंबईतल्या नौदलाच्या सैनिकांनी बंडाचा झेंडा उभारला. आता हिंदुस्तानमध्ये राज्य करणे अवघड आहे हे ब्रिटिश सत्ताधीशांना पुरते कळून चुकले; आणि लॉर्ड माउंटबॅटन यांना हिंदुस्थानला स्वातंत्र्य देण्यासाठी व्यावहारिक तपशील ठरवण्यासाठी पाठवण्यात आले. त्यांनी फाळणीची कल्पना काँग्रेस नेत्यांच्या गळी उतरविली आणि अखंड हिंदुस्तानच्या जागी भारत व पाकिस्तान या दोन देशांची निर्मिती झाली. पुढेही काही संस्थानिक गडबड करीत राहिले. परंतु सरदार पटेलांनी त्यांना वठणीवर आणले. काश्मीर प्रश्न मात्र लोंबकळत राहिला. अजूनही तो सुटलेला नाही.

या स्वातंत्र्यसमरातील पराक्रमाच्या कथा नेहमीच स्फूर्तिदायक वाटत राहतील. भारतीयांनी कृतज्ञतापूर्वक त्यांचे स्मरण ठेवायला हवे. तशी अनेक पुस्तके निघत आहेत.


'माइलस्टोन फिफ्टी : स्टोरीज् फ्रॉम इंडियाज् फ्रीडम स्ट्रगल' हे आर. के. मूर्ती यांचे विकास पब्लिशिंग हाऊसने प्रसिद्ध केलेले पुस्तक अठरा स्वातंत्र्यवीरांच्या जीवनातील उत्कट प्रसंगांचे चित्रण करते.

सर आशुतोष मुखर्जींनी उद्धट इंग्लिश अधिकाऱ्याची खोड मोडली. इंदिरा गांधींनी वानरसेना काढून महत्त्वाची कागदपत्रे सुरक्षित स्थळी नेली, उषा मेहता यांनी चलेजाव काळात भूमिगत राहून रेडिओ केंद्र चालवले, सुभाषचंद्रांनी इंग्रजांच्या तावडीतून सुटका करून घेतली, जानकीदासने झुरिचला युनियन जॅक काढून, तिरंगी झेंडा फडकवण्याचे साहस दाखवले, स्वातंत्र्यवीर सावरकरांनी एस एस मोरिआ बोटीच्या टॉयलेटच्या मार्गे समुद्रात उडी घेतली, चंद्रशेखर आझाद यांनी ब्रिटिशांचा छळ सोसूनही स्वत:च्या हाताने पिस्तूल स्वत:वरच झाडून वयाच्या २४व्या वर्षी आत्मबलीदान केले, दि बॉम्बे क्रॉनिकलचे संपादक हॉर्निमन यांनी भारतात राहण्याचा हक्क न्यायालयात चपखल युक्तिवाद करून मिळवला, जवाहरलाल नेहरूंनी सिल्व्हियाच्या पत्रकारितेच्या पर्वाचा उत्तम शुभारंभ करून दिला, वल्लभभाई पटेल यांनी शाळेतच अन्याय्य शिक्षेचा प्रतिकार करण्याचे धाडस दाखवले, सरोजिनी नायडू यांनी लंडनमधील कॅक्स्टन हॉलमध्ये हिंदुमुस्लीम ऐक्यासाठी निघालेल्या संस्थेचे उद्घाटन करण्यासाठी ना. गोपाळ कृष्ण गोखले यांना आणण्याचे वचन पूर्ण केले, चक्रवर्ती राजागोपालाचारी यांनी रेल्वेतून पडलेले घड्याळ अय्यरांना परत मिळवून दिले, क्रांतिवीर

भगतसिंगांनी घरच्या मंडळींचा लग्न करण्याचा प्रस्ताव धुडकावून लावण्यासाठी घराचा काही काळ त्याग केला, कस्तुरबांनी तुरुंगातही नियमाचे आदर्श पालन करून वॉर्डनला थक्क केले, बंकिमचंद्र चॅटर्जी यांनी वंदेमातरम्चे लेखन कुठल्या वातावरणात केले, मादाम भिकाजी कामा यांनी काँग्रेसचा तिरंगी झेंडा कसा तयार केला, वगैरे प्रसंगांचे या पुस्तकात आलेले किस्से वाचनीय आहेत. एकेका स्वतंत्र कथेसारखे चटकदार व नाट्यपूर्ण आहेत.

***कथा स्वातंत्र्यलढ्याच्या, पृष्ठे १७, साठ रुपये***

---




**एका जीवघेण्या व्याधीची सर्वांगीण अद्ययावत माहिती**

# कर्करोग असाध्य नाही

**मूळ लेखक : ए. एन. भिसे**
**अनु. : डॉ. राम दातार**

कॅन्सर म्हटले की आजही मनावर भीतीने दडपण येते. जगात सर्वात जास्त बळी घेणाऱ्या रोगांमध्ये कर्करोगाचा क्रमांक वरचा लागतो. कॅन्सरचे उपचारही खर्चिक व दीर्घकालीन असल्यामुळेही तो झाल्यावर मोठी आपत्ती ओढवल्यासारखे वाटते. कॅन्सरवर उपचार करणारी रुग्णालयेही फार थोडी आहेत. शहरात त्यासाठी जाऊन राहणे ही गोष्टही अनेक रुग्णांच्या कुटुंबांच्या आटोक्यात नसते. कॅन्सरबद्दलचे भय त्यामुळे सर्वांच्याच अस्वस्थतेला कारणीभूत होते. कुठलीही गाठ शरीरावर दिसली की कॅन्सरची शंका सतावू लागते.

कॅन्सर म्हणजे नेमके काय? त्याचे प्रकार किती? त्याच्या वरील उपचार कुठे व कसे केले जातात? कर्करोग आनुवंशिक आहे का? कर्करोग कुठल्या वयोगटातील लोकांना जास्त होतो? कर्करोग बरा झाल्यावर काय पथ्यपाणी ठेवावे लागते अशा अनेक प्रश्नांबद्दल कुतूहल असते.

डॉ. ए. एन. भिसे यांनी कॅन्सरवरील या सर्व प्रश्नांची उत्तरे देणारे पुस्तक लिहिले असून ते कॅन्सर-संशोधन क्षेत्रातील मार्गदर्शक डॉ. कमल रणदिवे, डॉ. वसंत रामजी



खानोलकर यांना अर्पण केले आहे. मूळ हे पुस्तक त्यांनी इंग्रजीत डॉ. बाळ फोंडके यांच्या आग्रहावरून प्रकाशन व माहिती संचालनालयासाठी लिहिले. त्याचा मराठी अनुवाद डॉ. राम दातार यांनी केला आहे. मध्येच अमेरिकेत उच्च शिक्षणासाठी त्यांना जावे लागले. तरी तेथून त्यांनी अनुवाद पूर्ण करून पाठवला हे विशेष!

काय? का? कसा?, कारणमीमांसा, कोड्याची उकल, दुभंग व्यक्तिमत्त्व, आ बैल मुझे मार, शत्रुसंहार आणि उद्याचे उपचार अशा सात प्रकरणात या विषयाची मांडणी डॉ. भिसे यांनी केली आहे. शरीरातील कॅन्सर-प्रवण अवयवांच्या रचनेची माहिती देऊन, कर्करोगाची विशिष्ट अशी लक्षणे नसल्याने त्याचे निदान व्हायला खूप वेळा उशीर होतो असा धोक्याचा इशारा दिला आहे.

१) शरीरात, स्तनात अथवा कोठेही दीर्घकाळ वाढणारी गाठ किंवा भरून न येणारा व्रण, २) अन्न गिळताना अन्ननलिकेत होणारा अडथळा, ३) सतत अपचन, ४) नेहमीच्या मलमूत्राच्या सवयीतील बदल, ५) अनैसर्गिक रक्तस्राव, ५) तीळ अथवा मस यात बदल होणे, ६) सतत येणारा खोकला किंवा दीर्घकालीन घोगरेपणा या गोष्टींकडे धोक्याचे कंदील म्हणून लक्ष वेधण्यात आले आहे. मात्र यापैकी एखाद्या लक्षणाने कर्करोग झालाय असे मानून घाबरू नये. डॉक्टरांना दाखवून शंकानिवारण करून घेणे मात्र इष्ट.

वेळेवर निदान झालेला आणि एकाच मर्यादित ठिकाणी असणारा कर्करोग शस्त्रक्रियेद्वारे पूर्णपणे बरा होऊ शकतो.

कर्करोगाची कारणे, प्राकृतिक, भाजणे, क्ष किरण, अतिनील किरण, दाह, इजा, लैंगिक संबंध, आनुवंशिकता, अपूर्ण प्रतिरक्षा, वय, तंबाखू सेवन, ॲनिलिन प्रकारचे रंग, निकेल, क्रोमेट या गोष्टीतही सापडतात. विषाणूंमुळेही हा रोग होऊ शकतो. रॉस सार्कोमा, पॅपिलोमा व्हायरस हे दोन विषाणू ज्ञात झाले आहेत.

तोंड, घसा, अन्ननलिका, यकृत, जठर, आतडे, गुदद्वार, लिम्फ ग्रंथी, मूत्राशय, प्रोस्टेट ग्रंथी, स्तन, गर्भाशयाचे तोंड, हाडे, पांढऱ्या पेशी, मज्जासंस्था, त्वचा अशा अनेक ठिकाणी कर्करोग होऊ शकतो.

जैविक अभियांत्रिकीच्या संशोधनातून कर्करोगी पेशी आणि निरोगी पेशी ओळखण्याचे काही ठोकताळे हाती लागले आहेत.

कर्करोगाच्या विषाणूची कार्यपद्धतीही उलगडू लागली आहे. कर्करोगाचा विषाणू सामान्य पेशीत प्रवेश करतो. विषाणूचे जननिक द्रव्य पेशीद्रव्यात जाऊन जननिक द्रवात प्रवेश करतो. पुढे पेशीविभाजन होते व कर्करोगाच्या पेशी तयार होतात. रक्तातील पांढऱ्या पेशी कर्करोगाच्या पेशींचा नाश करतात. परंतु कर्करोगी पेशी या एखाद्या ओढ्यापासून हळूहळू नदी

व्हावी तशा विस्तारत जातात.

अनुवंशिकतेने कर्करोग होऊ शकतो; पण बऱ्याचदा चुकीच्या अन्नामुळे व जीवनपद्धतीमुळेही तो होतो.

कर्करोगाच्या बंदोबस्तासाठी, विकिरण पद्धती (क्ष किरण, गॅमा) उच्च शक्तीचे इलेक्ट्रॉन्स यांचा वापर केला जातो. या किरणांचे काही दुष्परिणामही आढळतात.

रासायनिक उपचार पद्धतीचाही वापर केला जातो. सायक्लोफॉस्फामाइड, पाच-फ्लोरोयुसासिल, सायटोसिन ॲराबिनोसाइड इ. औषधे वेगवेगळ्या रीतीने वापरण्यात येतात. नवीन संशोधन तर जगभर चाललेलेच आहे. टॅक्सॉल हे कर्करोगाविरोधी रसायनही वरदान ठरेल असे दिसत आहे. सदाफुलीपासूनही कर्करोगावरचे औषध बनवण्यात येत आहे. जनुकांमध्ये बदल करूनही हा रोग बरा करण्याचे तंत्र विकसित होत आहे.

उद्याचे उपचार या प्रकरणात भावी औषधयोजनेचा व उपायांचा मागोवा घेण्यात आला आहे.

कर्करोगाविषयीची वास्तव माहिती देऊन, अकारण वाटणारी भीती दूर करणारे हे पुस्तक आहे.

*कर्करोग असाध्य नाही, पृष्ठे ९६, पन्नास रुपये*

---

### वनस्पतींमध्ये हवे तसे बदल घडवून आणणारे विलक्षण जैवतंत्रज्ञान

## हिरवे जनुक

**शकुंतला भट्टाचार्य**

**इ.** स. १९५० नंतर डीएनएच्या रचनेचा शोध लागला, त्यापाठोपाठ जननिक संकेतवर्णाचा शोध लागला, आणि रेणुजीवशास्त्राचा पाया घातला गेला. रेणूजीवशास्त्रज्ञांनी जैवतंत्रज्ञानाच्या प्रगतीला चालना देऊन वनस्पतींच्या प्रजननाबाबत अनेक प्रयोग चालवले आहेत. पीकांना होणारे रोग आणि त्यांचा नाश करणारे कीटक यांचे नियंत्रण करून अधिक उत्पादनक्षम अशा वनस्पतींच्या, फळझाडांच्या, कडधान्यांच्या जाती विकसित करण्याचे प्रयत्न जगभरच्या प्रयोगशाळांमध्ये मोठ्या जिद्दीने चालू आहेत.

प्रकाश संश्लेषणाचा वेग वाढवणे.

साठवणूक करण्यासाठी उपयुक्त असे रचनात्मक आणि गुणात्मक बदल घडवून आणणे.

प्रथिनांमध्ये संतुलित स्वरूपात ॲमिनो आम्ले आणणे.

नायट्रोजन स्थिर करणारा हवे तसे बदल करणे.

वाढीच्या नियंत्रणकार्यात फेरबदल घडविणे.

पर्यावरणातील दबावाला तोंड देऊ शकणाऱ्या वनस्पतींची निर्मिती करणे.

पिकांची गुणवत्ता सुधारणे.

पाहिजे तशा वनस्पती निर्माण करणे.

औद्यगिक व आरोग्यविषयक उत्पादने मिळवण्यासाठी पारदीनरुपीय वनस्पतींचा शोध घेऊन विशिष्ट रसायने आणि बायोपॉलिमर्स (जैविक बहुवारिक) बनवण्यासाठी वनस्पतींमध्ये जनकीय फेरबदल घडवून आणणे.

माणसाच्या शरीरातच बनणारी प्रथिने वनस्पतींच्या माध्यमातून बनवणे. उदा. माणसाच्या मेंदूमध्ये तयार होणारे ल्यू-एनकेफेलिन हे वेदनाशामक जैवरसायन मोहरीपासून निर्माण करण्यात यश आले आहे. मेलॅनिन हे मानवी त्वचेतील रंगद्रव्य पारजीनरुपीय तंबाखूकडून मिळवण्यात आले आहे.

मानवी शरीर रोगजंतूंशी मुकाबला करते त्याप्रमाणे वनस्पतींनीही त्यांना नष्ट करणाऱ्या विषाणूंविरोधी लढणारी प्रतिद्रव्ये बनवावी या कल्पनेतून संशोधनाची एक दिशा गवसली. प्लांटी बॉडी (प्लँट ॲंटिबॉडी) हे नाव अशा प्रतिद्रव्यांना देण्यात आले. या संशोधनाला व्यापारी दृष्ट्या मोठे महत्त्व आहे.

अन्नप्रक्रिया उद्योगात लागणारी विकरे बनवण्यासाठी जैविक बहुवारिकांसाठी, औद्योगिक तेले बनवण्यासाठीही संशोधन चालू आहे. उदा. डिटर्जंटमध्ये लॉरिक आम्ल लागते. ते पाम आणि नारळापासून काढतात. हे आम्ल शेतात उगवणाऱ्या वनस्पतीपासून मिळाले तर सोयीस्कर ठरेल. कॅलजीन कंपनीने डिटर्जंट उद्योगाला उपयुक्त अशा दोन विशेष तेलांची मोहरीपासून निर्मिती केली आहे. मोहरीमध्ये होहोबा तेल मिळावे असेही प्रयोग चालू आहेत.

प्लॅस्टिक ही कृत्रिम रासायनिक वस्तू - असे आपण मानतो. परंतु ते वनस्पतीपासून मिळवण्याचे प्रयोग यशस्वी होत आहेत. पीएचबी (पॉलिहायड्रॉक्सीब्युरिरेट) हे अल्कालीजेनेस युट्रॉपस या जीवाणूकडून मिळवले शक्य झाले आहे.

अमायलेग हे विकर अन्नउद्योगात वापरल्या जाणाऱ्या स्टार्चचे विघटन करते. त्याला खूप मागणी आहे. तंबाखूच्या झाडापासून हे विकर मिळावे अशी पद्धत डच व अमेरिकन कंपन्यांनी विकसित केली आहे. या तंबाखूपासून मिळणारे विकर शुद्ध विकराइतकेच कार्यक्षम असते. बियांमध्ये हे विकर साठवले जाते.

हरितगृहे आणि काचगृहे यांचे तंत्रज्ञान विकसित होत आहे.

वनस्पती पाण्यात वाढवण्याचे तंत्र प्राचीन आहे; त्यामार्गे शेतातील उत्पादनापेक्षा जास्त प्रमाणात उत्पादन मिळवता येईल. शेतात टोमॅटोचे दर एकरी २२०टन उत्पादन होते. तर हरितगृहात ४५० टन उत्पादन होते. एकविसाव्या शतकात जगातील २५ टक्के अन्न हे जलसंवर्धनातून (हायड्रोपोनिक्स) पिकवण्यात येईल.

अशा अनेक आश्चर्यकारक गोष्टी 'हिरवे जनुक' या पुस्तकामुळे आपल्याला ठाऊक होतील. भारत सरकारच्या जैव अभियांत्रिकी विभागातर्फे पुस्तक प्रकाशनाचा एक प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. त्यातील 'ग्रीन जेने' हे पुस्तक शकुंतला भट्टाचार्य यांनी तयार केले आहे. त्याचा हा मराठी अनुवाद डॉ. प्रमोद जोगळेकर यांनी केला आहे.

पर्यावरणासाठी अनुकूल अशा सूक्ष्मजीवांचा, नील हरितशैवालाचा, बुरशी आणि गांडुळांचा उपयोग मातीचा सुपीकपणा वाढवण्यासाठी केला जात आहे. सूक्ष्मजीवातील विषारी प्रथिनांचा वापर जनुक वनस्पतींमधील किडीचे नियंत्रण करण्यासाठी वापरले जात आहे. विंचवाच्या विषाचे जनुकही त्यासाठी वनस्पतींच्या जीनमध्ये बसवण्यात आले आहे. जैविक विविधतेचे रक्षण करण्यासाठी जगभर आज बीज बँका, जनुकांच्या बँका व वन्यजीवांसाठी संरक्षित अभयारण्ये उभारली जात आहेत. वनस्पतींचे कृत्रिम संवर्धन करण्याचे तंत्रही विकसित होत आहे.

या पुस्तकात जैवतंत्रज्ञानाचा कृषिक्षेत्रातील वापर कसा महत्त्वाचा व सर्वगामी आहे याची माहिती देण्यात आली आहे. १९३० ते १९७० या कालावधीत शेतीच्या स्वरूपात आमूलाग्र क्रांती करणारे सजीवांमधील आनुवंशिक डीएनए (डी-ऑक्सिरायबोन्युक्लिक आम्ल) यासारखे शोध लागले. या डीएनएची रचना कशी आहे हे उलगडले; जननिक संकेतवर्णमालेचा शोध लागला. या वर्णमालेमुळे आनुवंशिक घटकामधील माहिती प्रथिन स्वरूपात भाषांतरित करता येते. प्रथिने म्हणजे ॲमिनो आम्लांची शृंखलासदृशरचना. शरीरातील विविध प्रक्रियांमध्ये विवंचक म्हणून भाग घेणारे विकर हे प्रत्यक्षात प्रथिनेच असतात. पेशीच्या केंद्रकात असणाऱ्या डीएनए आणि पेशीद्रव्यात तयार होणारे प्रथिन यातील मध्यस्थ दुवा म्हणून आरएनए (रायबोन्युक्लिक आम्ल) काम करते.

याबाबत अनेक शास्त्रज्ञांनी प्रयोग केले आणि अनेक गोष्टींचा शोध लावला. एकेका



शोधात सापडलेल्या माहितीचा व निष्कर्षाचा उपयोग त्यापुढचा टप्पा गाठण्यासाठी केला. उदाहरणार्थ, जोशुआ लेडरबर्ग या अमेरिकन शास्त्रज्ञाला १९५२मध्ये जीवाणूंमधील मीलनात जननिक घटकांची नर-मादी/मेल-फिमेल/एम-एफ अशी दोन प्रकारची देवाणघेवाण होते असे आढळून आले. एफ या स्त्री जीवाणूमध्ये प्लासमिड हा छोटा घटक असतो, हा प्लासमिड एफकडून एमजीवाणूकडे हस्तांतरित होतो. त्याच्याच पुढच्या वर्षी विल्यम हेस याने प्लासमिड हा घटक डीएनए पासून बनलेला आहे असा शोध जाहीर केला. प्लासमिडमधील डीएनए रेणू गोलाकार असून ते पेशीद्रव्यात असतात; ते केंद्रकात असणाऱ्या गुणसूत्रामधील डीएनएपेक्षा वेगळे असतात.

जीवाणूंमध्ये गाठ उत्पन्न होते, त्यालाही प्लासमिडच कारणीभूत असतो. १९८६ मध्ये ए.सी. ब्राउन यांना असे आढळले की नेहमीच्या गुणसूत्रामध्ये असणाऱ्या डीएनए रेणूव्यतिरिक्त ॲग्रोबॅक्टेरियम ट्युमिफॅसियन्समध्ये एक छोटा वतुळाकार व दुहेरी डीएनए रेणू आढळून येतो. त्याला त्याने टीआय (ti) असे नाव दिले. त्या टीआय प्लासमिडमुळे जीवाणूमध्ये गाठ तयार होते. काही जीवाणू फुटल्याने त्यांचे डीएनए रेणू वनस्पतींमधील पेशीमध्ये मोकळे होतात; आणि त्या क्षणापासून गाठ निर्माण करण्याची त्या जीवाणूंची क्षमता संपुष्टात येते. या शोधाचा वापर अनेक पातळ्यांवर होऊ शकतो. क्राऊन गाल या रोगाच्या पेशीत टीआय प्लासमिड वाहून नेणाऱ्या फुसलाव्या जीवाणूंनी उपयुक्त कार्य केले. पुढेही नियोजित जननिक सामुग्री वाहून नेण्याचे काम हे जीवाणू करत राहतील.

वनस्पतींच्या उत्पादनात नव्या तंत्रज्ञानाने प्रचंड वाढ अपेक्षित आहे. केळीचे झाड वर्षाला २/३ नवी रोपे या हिशेबाने वाढते. प्रगत तंत्राने मात्र तीन आठवड्यात ४० रोपे मिळतात. पुढच्या तीन आठवड्यात १६०० रोपे; पुढच्या तीन आठवड्यात ६४००० रोपे, अशा वेगाने तीन महिन्यात २५ लाख रोपे मिळू शकतात. सूक्ष्म प्रवर्धनाचे हे तंत्र कृषिक्षेत्रात आमूलाग्र क्रांती घडवील.

अशा अनेक उद्बोधक शोधांची माहिती देणारे व नवनव्या कल्पना सुचवणारे हे पुस्तक कुमारवाचकांनाच नव्हे तर प्रौढांनाही उपयुक्त वाटेल.

*हिरवे जनुक, पृष्ठे ९६, साठ रुपये*

**हा खेळ बाहुल्यांचा**

डी.एस्. इटोकर

*या पुस्तकावरून तुम्ही सुंदर सुंदर बाहुल्या सहज तयार करू शकता.*

किंमत : *फक्त पन्नास रुपये*

पोस्टाने : *साठ रुपये*

# फुले आणि काटे

## आपले विद्वान

'डॉ. आंबेडकरांचे सामाजिक धोरण : एक अभ्यास' ह्या पुस्तकाच्या प्रास्ताविकात आपल्याकडील विद्वान अभ्यासकांचा लेखक शेषराव मोरे यांनी दिलेला अनुभव मोठा मर्मभेदक आहे; म्हणून थोड्या संक्षेपाने तो येथे देत आहोत.

"बाबासाहेबांच्या सामाजिक धोरणातील परिवर्तनाचा अभ्यास करणारा हा ग्रंथ आहे. या अभ्यासाच्या संदर्भात त्यांच्या जीवनकार्याची, विचारांची वा ग्रंथांची चर्चा या पुस्तकात आलेली आहे. ग्रंथविषय खूपच व्यापक, महत्त्वाचा तसाच नाजूक असल्यामुळे तो प्रकाशित करण्यापूर्वी तज्ज्ञांना दाखवावा व त्यानुसार त्यात सुधारणा करावी असे मी ठरविले... त्यानुसार हस्तलिखिताच्या प्रती तज्ज्ञमंडळीकडे पाठवल्या. महाराष्ट्र शासनाने खंड ३ ते ५ मध्ये बाबासाहेबांचे अप्रकाशित असलेले साहित्य पहिल्यांदाच प्रसिद्ध केलेले आहे. ते अंतरिम स्वरूपाचे आहे; व ते बाबासाहेबांनी या स्वरूपात प्रसिद्ध केले नसते, करू दिले नसते. संपादक मंडळाने या दृष्टीतून न वाचताच हे वाङ्मय प्रसिद्ध करून एकप्रकारे अन्याय केलेला आहे असे माझे मत मी जागोजाग नोंदवले आहे. तेव्हा या संबंधात आपली कोणती चूक राहू नये म्हणून या ग्रंथाचे हस्तलिखित संपादकमंडळातील दोन प्रमुख सदस्यांकडे त्यांच्या पूर्वसंमतीने मी सादर केले. मी स्वत: अनुक्रमे मुंबईला व पुण्याला त्यांच्या घरी जाऊन ते देऊन आलो. त्यानंतर मुंबई-पुण्याला गेल्यावर त्यांची भेट घेत राहिलो. तथापि कार्यबाहुल्यामुळे वा प्रकृती अस्वास्थ्यामुळे दोघांनाही वेळ मिळत नसल्या कारणाने त्यांच्याकडून ग्रंथाविषयी अभिप्राय वा सुधारणा येणे लांबत चालले. शेवटी हे काम त्यांच्याकडून पूर्ण होणार नसल्याचे दोघांनीही मला कळवले. या प्रतीक्षेत एकदीड वर्ष निघून गेले. त्यांना प्रत्येकी दिलेली प्रत अद्यापही त्यांच्याकडेच आहे."

**-शेषराव मोरे** (डॉ. आंबेडकरांचे सामाजिक धोरण : एक अभ्यास, लेखकाचे दोन शब्द. पृष्ठ तीन-चार, प्रकाशक-राजहंस प्रकाशन, पुणे ३०.)

## अग्रगण्य अमेरिकन विनोदकार आर्ट बुकवॉल्डचे वेगळेपण

आपल्याकडचे चांगले नावाजलेले विनोदी लेखकही आपल्या कथाविषयाकडे एका उच्च पातळीवरून, काहीशा आढ्यतेने पाहतात. 'मी ज्या माणसांविषयी लिहितोय ती माणसे तऱ्हेवाईक, वेंधळी वगैरे असतील, पण मी तसा नाही बरं का' असे ते सारखे सुचवत



असतात. आर्ट बुकवॉल्ड या अमेरिकन विनोदी स्तंभ लेखकात मात्र अशी आढ्यता दिसत नाही. तो म्हणतो, 'गड्यांनो, ज्या माणसांविषयी मी लिहितोय ती जशी तऱ्हेवाईक, वेंधळी, घोटाळे करणारी, लुच्चेगिरी अगर मूर्खपणा करणारी आहेत, तसाच मी देखील आहे; आणि रागावू नका, तुम्ही देखील तसेच आहात. आपण माणसे ही सगळी अशीच असतो. कधी आपल्याला हे कळते. कधी कळत नाही. पण आपण असेच वागत राहतो." अशी भूमिका घेतल्यामुळे बुकवॉल्डच्या विनोदाला एक वेगळीच खुमारी येते. त्याचे आपले नाते घरगुती होते. आढ्यता बाजूला ठेवल्याने आपली मनोवृत्ती सैल सुटते आणि अनेक गोष्टीतील गंमत आपल्याला चाखता येते. उगीचच काहीतरी पोरकट कल्पना रचत जाणे यात मौज असते. खुळचटपणात वाहवून जाणे यातही गंमत असते. बाष्कळपणाचा मागोवा घेत गेले तरी तवकील जिभेवर ठेवल्यावर होतात तशा गुदगुल्या होतात हे आपल्याला कळते. विनोदाच्या क्षेत्राचा खूपच विस्तार होतो. विनोद करताना सतत हुषारी दाखवणाऱ्या आपल्या मराठी विनोदकारांनी या गोष्टीचा बोध घ्यायला हवा. एखादा नैमित्तिक वा तात्कालिक विषय घेऊन तो लिहितो, पण त्या विषयाला तो चिरंतन ताजेपणा प्राप्त करून देतो. हा ताजेपणा बुकवॉल्डच्या मनोवृत्तीचा आहे. वातावरण निर्मितीच्या त्याच्या कसबामुळे तो निर्माण होतो. त्याचे विषय आपल्याला परके असले तरी त्या माणसांचा जो तऱ्हेवाईकपणा, विक्षिप्तपणा, लुच्चेगिरी किंवा मूर्खपणा तो चित्रित करीत असतो, तो आपल्या परिचयाचा असतो, नित्य आपल्या आसपास दिसत असतो किंवा खरे म्हणजे पुष्कळदा आपणच तसे वागत असतो. त्यामुळे तो ज्या काही हकिकती सांगत असतो, त्यात आपण सहजच रंगून जातो.

**-प्रा. गंगाधर गाडगीळ** (साहित्य चिंतन आणि शोध, पृष्ठ १२२-१२३, प्रकाशक-सन पब्लिकेशन, पुणे)

## खांडेकरांच्या 'नंदादीप'चा संदेश

वि. स. खांडेकर यांचे मराठी साहित्यातले कालचे आणि आजचे स्थान विचारात घेतले; तर उद्या ते काय म्हणून उरतील असा प्रश्न पुढे येतो. आजच्या धक्काबुक्कीच्या यांत्रिक व बेचव जीवनात त्यांच्या वाङ्मयाला वाचक मिळेल काय? त्यांचे जीवन विश्वासार्ह राहील काय? खांडेकरांनी तीन पिढ्या आपल्या मुठीत घेतल्या. त्यातून चौथी पिढी काही घेऊ शकेल का? या पिढीच्या पार्श्वभूमीवर खांडेकर काही देऊ शकतात का? या सर्व प्रश्नांची उत्तरे आपण शक्याशक्यतेच्या परिसरातून देऊ पाहतो. आणि हा परिसर कल्पनेचा असल्याने एका अर्थाने स्वप्नसृष्टीचा आहे. ध्येयधुंदी, समाजसेवेची धुंदी, अध्यापनाची धुंदी यातून खांडेकरांची वाङ्मयीन धुंदी निर्माण झाली. धुंदपणा हा देखील एका अर्थाने स्वप्नाचाच अनिवार्य घटक, जोपर्यंत मानव आहे तोपर्यंत त्याला ही धुंदी आहे. कार्यमग्नता एका परीने

जीवनमग्रतेशी अविभाज्य राहू पाहते. पिढीचा विचार करताना हे तत्त्व लक्षात ठेवल्यास भाऊंचे जीवन व वाङ्मय याच धुंदीचा आलेख पुढे ठेवते. जीवन व वाङ्मय यांचे नाते नेहमी सगुण-निर्गुणासारखे असते. सगुणाकडून निर्गुणाकडे जायचे व शेवटी निर्गुणमय व्हायचे. हेच निर्गुण प्रत्येक पिढीत नवे रूप, नवे तेज धारण करते. कालच्या पिढीने खांडेकरांना डोक्यावर घेतले, आजच्या पिढीने त्यांना कदाचित अंतर्मुखतेतून अंगीकारले असेल, त्यातूनच उद्याची पिढी या विकासाचा अटळ क्रम राहील. भाऊंच्या घराचे नाव नंदादीप. नंदादीप कधीच विझत नसतो; उलट विझण्याचा ध्यास चटका देतो. भाऊंच्या कादंबऱ्यांची शीर्षके ज्या उत्स्फूर्त प्रेरणेतून त्यांना सुचली असतील, त्या प्रेरणेचे किरण नंदादीपला तेजोवलय देऊ पाहतात. माझी ज्योती अखंड तेवत राहो अशी साद नंदादीपाद्वारे जणू ते देत आहेत.

**-प्रा. मधु जामकर** (आकाशदिवे, पृष्ठ १३१-१३२, प्रतिमा प्रकाशन, पुणे ३०.)

## मेंदूचे कार्य आणि कवीची उदासीनता

कवीची उदासीनता हा किती गंभीर विषय आहे, तो केवळ वाङ्मयाचा, केवळ मानसशास्त्राचा विषय नसून, मेंदूच्या स्वरूपाचा विषय आहे, हे डॉ. तिंबले यांनी दाखवून दिलं आहे. मेंदूविरहित मानसशास्त्राचा व मानसविरहित मेंदूचा अभ्यास या कल्पना आता कालबाह्य झाल्या आहेत. मेंदूचा प्रात्यक्षिक, प्रायोगिक अभ्यास सुरू झाला आहे. नवनव्या औषधांचाही शोध लागत आहे. अशा प्रकारे काव्याचा अभ्यास मेंदूपर्यंत पोहोचला असून, ज्ञानाचं नवं पर्वच सुरू झालं आहे. कवीची मनोरचना, त्याची वृत्ती सर्वस्वी त्याच्या मेंदूच्या स्वरूपावरच आधारित असणार, हे उघड आहे. म्हणूनच असं म्हणावंसं वाटतं की, काही व्यक्तींची व काही कवींची दुःखाची जाणीव त्यांच्या विशिष्ट मेंदूमुळे सखोल बनते. एखाद्या शोककारक घटनेचा परिणाम भिन्नभिन्न व्यक्तींवर भिन्नभिन्न प्रकारांनी होतो, हे आपण पाहतो. कोणी दुःखात शांत राहू शकतात, तर कोणी उन्मळून पडतात. विशिष्ट संदर्भात दुःखाला तर जागाच नाही. उलट प्रसंग आनंदाचाच आहे, असे कोणी मानत असतानाच त्याच प्रसंगी दुःखमय होऊन जगातून बाहेर पडण्याचा प्रयत्न करणारेही कोणी असतात. गौतम बुद्ध, रामदासस्वामी ही नावे उदाहरणादाखल सांगता येतील. आईनस्टाईनसारख्यांच्या मेंदूचा अभ्यास अजूनही चालू आहे, असं म्हणतात. आईनस्टाईनची प्रगल्भता त्याच्या विशिष्ट मेंदूमुळेच. तसेच कवीची उदासीनतेची जाणीव त्याच्या विशिष्ट मेंदूमुळेच. वरील महापुरुषांनी घडविलेलं जगाचं दर्शन आपण स्वीकरतो. तसंच कवींनी घडविलेलं जगाचं दर्शनही आपण स्वीकारतो.

**-डॉ. मुरलीधर जावडेकर,** (दैनिक देशदूत, शब्दगंध पुरवणी, रविवार २ ऑगस्ट ९८)



## वेदविद्या : भारतीयांचे सांस्कृतिक संचित

वेद हेच भारतीय संस्कृतीच्या यथार्थ आकलनाचं मूळ साधन आहेत. त्यांचा यथाशक्ती अभ्यास करण्याचा प्रयत्न आपण केला नाही, तर आपल्या थोर विचारघनास आपण मुकूच; पण या महान राष्ट्रास विभिन्न प्रकारे दुर्बल बनविण्यासाठी चाललेलं सांस्कृतिक व वैचारिक आक्रमण आत्मविश्वासानं परतविण्याची शक्तीही गमावून बसू. आर्यांचा मूळ निवास भारताबाहेर होता. आर्यांनी या देशावर आक्रमण करून द्रविडांचा पराभव केला वगैरे विदेशी खोडसाळ कल्पनाविलास निकालात काढून या अनादि वैदिक राष्ट्रावरील निष्ठा अबाधित ठेवत, हा देश अखंड व अजिंक्य होण्याइतका समर्थ करण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन व स्फूर्ती या वैदिक वाङ्मयातूनच उपलब्ध होणे शक्य आहे. भारताचा गौरव व अस्मिता यांचे जतन करण्यासाठी वेदवाङ्मयाचं चिंतन ही राष्ट्रीय आवश्यकता आहे.

**-आचार्य किशोरजी व्यास,** (दैनिक देशदूत, रविवार २-८-९८)

**पालकांसाठी खुषखबर !**

*खास मुलांसाठी आम्ही **एक आकर्षक सवलत योजना** जाहीर करीत आहोत. आपण ऑगस्ट महिन्यापासून १० महिने दरमहा २० रु. पाठवा. आपल्या मुलांसाठी पुढील मे महिन्यात ३०० रुपयांची आपल्या पसंतीची पुस्तके आम्ही आमच्या खर्चाने पाठवू. त्वरा करा. या योजनेचे सभासद व्हा व मुलांसाठी मे महिन्यात छान छान भरपूर पुस्तके घरपोच मिळवा.*

*आमचा पत्ता : **मेहता मराठी ग्रंथजगत,** १२१६, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०.*

*विविध विषयावरील उत्तम मराठी पुस्तकांसाठी अवश्य भेट द्या.*

**आयडियल पुस्तक त्रिवेणी**

छबिलदास रोड, दादर (पश्चिम), मुंबई - २८. फोन - ४३०२१२६

## स्पर्धा (१) पुस्तकांची नावे कळवा - बक्षीस मिळवा

यावेळची स्पर्धा रसिक वाचकांना आवडणारी ठरेल. पुढे दिलेले तीनही लेखक व त्यांची पुस्तके अत्यंत लोकप्रिय ठरलेली आहेत. त्यास अनुसरूनच ही स्पर्धा योजली आहे.

- ❑ व.पु. काळे यांच्या *१० कथासंग्रहांची* नावे कळवा.
- ❑ वि. स. वाळिंबे यांनी लिहिलेल्या राजकीय विषयावरील ५ *अनुवादित पुस्तकांची* नावे कळवा.
- ❑ वि. स. खांडेकरांनी लिहिलेल्या ५ *रुपककथासंग्रहांची* नावे कळवा.

बरोबर उत्तरे देणाऱ्यांपैकी तिघांना लॉट टाकून प्रत्येकी १०० रुपये किंमतीची पुस्तके बक्षीस म्हणून देण्यात येतील. निकाल डिसेंबरच्या अंकात प्रसिद्ध होतील.

उत्तर कार्डावर पाठवा. मुदत – **२० ऑक्टोबर १९९८.**

*आमचा पत्ता :* **मेहता मराठी ग्रंथजगत,** मेहता पब्लिशिंग हाऊस,
१२१६, सदाशिव पेठ, पेरूगेटाजवळ, पुणे – ४११०३०.


***मेहता मराठी ग्रंथजगत***

दीपावली १९९८

मराठी ग्रंथजगतचा दीपावली विशेषांक ऐन दिवाळीत आपल्या हाती पडेल. मान्यवर लेखकांच्या आवडत्या पुस्तकांच्या जन्मकथा त्यात वाचायला मिळतील.

***या अंकातील काही मानकरी :***

डॉ. आनंद यादव, मृत्युंजयकार शिवाजी सावंत, डॉ. निर्मलकुमार फडकुले, माधव मोर्डेकर, मंगला निगुडकर, वामन देशपांडे, उमा कुलकर्णी, आशा कर्दळे इ.

सोबत नेहमीची वाचनीय लोकप्रिय सदरे आहेतच.

आजच वर्गणीदार व्हा व दिवाळी अंक घरपोच मिळवा.

**वार्षिक वर्गणी ५०/-**

**भेट पुस्तकाच्या पोस्टेजसह ६५/-**




## वाचकांचा प्रतिसाद

जुलै ९८च्या अंकात 'रंग सुखाचे' या डॉ. रमा मराठे यांच्या पुस्तकाबद्दल इतके चांगले परीक्षण आले की ते पुस्तक विकत घेऊन वाचायची अनिवार ओढ लागली, 'रंग सुखाचे' वाचले. एका उत्तम पुस्तकाचे छान परीक्षण केल्याबद्दल अभिनंदन! वाचकांना, जागृत करणाऱ्या परीक्षणांची सध्या खूप गरज आहे आणि आपले 'ग्रंथ जगत' ते छान काम करत आहे.

**–सुरेश पोरे, पुणे**

आज वाचनाची अवड कमी झालेली आहे. त्याची जागा 'दूरदर्शन' घेतलेली आहे. वाचनामुळे मनुष्य चिंतनशील, विचारशील बनतो. आपण तमाम सर्व मराठी रसिकांना – दर महिन्याला – मराठी भाषेतील पुस्तकांची माहिती देता. अनुवादित पुस्तकांचीही जाण ठेवता. त्याबद्दल आपले मन:पूर्वक आभार. हे आपले कार्य समुद्रकिनाऱ्यावरील 'दीपस्तंभा'सारखे आहे. मराठी ग्रंथजगतामधून आपण व्यवस्थापनेच्या पुस्तकांची ओळख करून घ्यावी. मराठी माणूस व्यवस्थापनेत कमी पडतोय? भरपूर कष्ट करतो पण त्याचे श्रेय दुसराच नेतोय? त्यासाठी मॅनेजमेंट वरील पुस्तकांचा समावेश – ओळख –करून द्यावी.

**–अरविंद सुसलादकर, परळी वैजनाथ**

मी 'मेहता मराठी ग्रंथजगतचा' सभासद असून अंक अतिशय आवडत असतात व ते मी मन:पूर्वक वाचत असतो.

'ग्रंथजगत'चे पुस्तक बाहेरून पाहिले असता अगदी छोटे दिसते. परंतु अंतरंग हा पूर्ण क्षितिजाला गवसणी घालणारा असतो. यामध्ये महान साहित्यकारांच्या साहित्याचा परिचय करून घेत असताना जणू 'लहान तोंडी मोठा घास' घेत आहोत असे वाटते.

**–दत्तराज वागले, शिरोली, राधानगरी**

आपले मासिक वाचले आणि साहित्यक्षेत्रातील एक नविन उपक्रमाची माहिती मिळाल्याचा आनंद झाला. ग्रामीण भागातील वाचनालयांचा सहभाग राहिल असे एखादे सदर सुरू करावे. ग्रामीण भागातील वाचनालयांना (उत्कृष्ठ) पुरस्कार वितरण योजना सुरू करावी.

या दोन्ही कारणांमुळे ग्रामीण वाचनालये आपल्याशी नियमितपणे संलग्न राहतील.

**–श्री विवेकानंद वाचनालय, ईट**

## जुलै १९९८ – 'आगळी वेगळी स्पर्धा' निकाल

उत्तर – सदर परिच्छेद *रणजित देसाई* यांच्या **'राधेय'** या कादंबरीतील आहे.

**यशस्वी स्पर्धक :**

१) **सौ. गोरी होनावर,** २/आर-८, गितांजली सोसायटी, प्रिआ पार्कजवळ, पो. मोहोपाडा-रसायनी, तालूका-खालापूर, जिल्हा-रायगड-४१०२२२.

२) **सौ. सुजाता पेंडसे,** १३६०,बी, खरी कॉर्नर, कोल्हापूर-४१६०१२.

३) **रमेश कोडमलवार,** बँक ऑफ बरोडा, सदर शाखा, लिबर्टी टॉकीजसमोर, नागपूर-४४०००१.

४) **लखनकुमार आर. कुमावत,** मु.पो. तोरखेडा, ता. शहादा, जि. धुळे, मराठा गल्ली, राजवाड्यासमोर, तोरखेडा-४२५४२३.

५) **वासंतिका पुणतांबेकर,** ७, शिवरंजनी-ब, २९ हॅपी कॉलनी रोड नं. १, कोथरुड, पुणे-४११०२९.

## जुलै १९९८ – 'पुस्तकांची नावे ओळखा, बक्षीस मिळवा' स्पर्धा निकाल

**उत्तर :**

*नाथ हा माझा, धूळपाटी, सांगत्ये ऐका, आय डेअर-किरण बेदी, आहे मनोहर तरी, मी फूलनदेवी, नाच ग घुमा, रास, बंध अनुबंध, माझी कहाणी, भावफुले, फुले वेचिता, साथसंगत, सुवासिनी, स्मृतिचित्रे, आकाशाशी जडले नाते, लाव्हा, आदोर, मी भरून पावले आहे.*

**यशस्वी स्पर्धक :**

१) **सात्विका सुनील शिंदे,** कमान वेस, मु.पो.ता. अकोले-४२२६०१, जि. अहमदनगर.

२) **श्रद्धा मंजुरे,** तुलसी अपार्टमेंटस्, 'अे' विंग, दुसरा मजला, ५२, आनंद रोड, मालाड (पश्चिम), मुंबई – ४०००६४.

३) **जिव्हाजी रघुनाथ मुदगल,** १०/५५२ स्वागत हॉटेलजवळ, गोकुळ चौक, इचलकरंजी, जि. कोल्हापूर.

वरील दोन्हीही स्पर्धांत भाग्यवंत ठरलेल्या स्पर्धकांचे अभिनंदन. त्यांनी आपल्या आवडीची, आमच्या प्रकाशनाची रु. १००ची पुस्तके कळवावी. ती त्वरित पाठवण्यात येतील.



## स्पर्धा (२) पुस्तकांची नावे ओळखा - बक्षीस मिळवा

सोबत दिलेल्या माहितीच्या आधारे पुस्तकाचे नाव ओळखा.

१) □□□ प□ □□□र □ही
व. पु. काळे यांची कादंबरी

२) □□, □□र□, □□□□, □□□ल
आनंद यादव यांच्या आत्मचरित्रात्मक कादंबऱ्या

३) □ □□स □ □□से
वि. स. खांडेकरांचे व्यक्तीचित्रात्मक पुस्तक

४) प□□□
मूळ लेखिका – अमृता प्रीतम, अनुवाद – माधवी देसाई

५) आ□ □□र □र□ □□
मूळ लेखक – परमेश डंगवाल, अनुवाद – आशा कर्दळे

६) □□□से □□□ म्ह□□
शान्ता शेळके यांचे ललित लेखांचे पुस्तक

बरोबर उत्तरे देणाऱ्यांपैकी तिघांना लॉट टाकून प्रत्येकी १०० रुपये किंमतीची पुस्तके बक्षीस म्हणून देण्यात येतील. निकाल डिसेंबरच्या अंकात प्रसिद्ध होतील.

उत्तर कार्डावर पाठवा. मुदत – **२० ऑक्टोबर १९९८.**

*आमचा पत्ता :* **मेहता मराठी ग्रंथजगत,** मेहता पब्लिशिंग हाऊस,
१२१६, सदाशिव पेठ, पेरूगेटाजवळ, पुणे – ४११०३०.

शाळा, महाविद्यालयं, ग्रंथालयं आणि साहित्यप्रेमींना खूषखबर!
अनेक विषयांवरील मराठी पुस्तकं मनमोकळ्या वातावरणात तासन् तास
मनसोक्त पाहण्यासाठी आणि खरेदी करण्यासाठी

**कोल्हापूरमधील एकमेव ठिकाण**


**मेहता बुक सेलर्स**

३२२, भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर ४१६०१२.
फोन : ५२२३०४ टेलिफॅक्स : ५२१८८१

# T Book Club

## ग्रंथप्रेमींसाठी आकर्षक योजना

या बुक क्लबचे सभासद २० रुपये भरून होता येते. या क्लबअंतर्गत दरवर्षी गाजलेल्या सहा इंग्रजी पुस्तकांचे अनुवाद प्रकाशित केले जातात. सभासद झाल्यास ही पुस्तके आपण निम्म्या किंमतीत मिळवू शकता. जसजशी पुस्तके प्रकाशित होतील, तसतशी आपणांस त्यासंबंधीची माहिती कळवली जाईल. आपण ही सर्व सहाही पुस्तके घ्यावयाची आहेत.




⇦ **T बुक क्लब-८** मधील पहिले पुस्तक उपलब्ध आहे.
गतिमान काळाच्या झंझावाती प्रवाहात वेगानं बदलत चाललेल्या स्त्री पुरुषांमधल्या नात्यांची अत्याधुनिक कहाणी

**डिस्क्लोजर**

मूळ लेखक : **मायकेल क्रिश्टन**
अनुवाद : **माधव कव**

■ मूळ किंमत **रु. २२०.००** ■ सभासदांना **रु. ११०.०**
सभासद फी २०रु. व पोस्टेज १५रु. मिळून एकूण १४५रु. मनीऑर्डरने पाठवावे अथवा पुस्तक समक्ष येवून घेऊन जावे.

### आतापर्यंतच्या बुक क्लब मधील उपलब्ध पुस्तके

| पुस्तकाचे नाव | मूळ लेखक | अनुवाद |
|---|---|---|
| मध्यस्थ | फ्रेडरिक फोरसीथ | लीना सोहोनी |
| वाईल्ड कार्ड | रेमंड हॉकी/ रॉजर बिंग हॅम | अरुण मांडे |
| लव्ह स्टोरी | एरिक सेगल | अनिल इनामदार |
| सिटाडेल | ए. जि. क्रोनिन | मंगला निगुडकर |
| नो कम बॅक्स | फ्रेडरिक फोरसीथ | विजय देवधर |
| हे बंध वात्सल्याचे | हेरॉल्ड रॉबिन्स | योगिनी वेंगुर्लेकर |
| तू असा जवळी रहा | हेरॉल्ड रॉबिन्स | पद्मा अभ्यंकर |
| मुखवटे | ॲगाथा ख्रिस्ती | शर्मिला गाडगीळ |
| पाषाण | ॲगाथा ख्रिस्ती | शर्मिला गाडगीळ |
| नाईट | इली वायझेल | आशा कर्दळे |
| द मिरर क्रॅकड | ॲगाथा ख्रिस्ती | श्रीनिवास गुळवणी |
| हंट द मॅन डाऊन | विल्यम ह्यूमन | अरुण डावखरे |
| ट्रिनिटीज चाईल्ड | विल्यम प्राक्नो | अनिल काळे |
| साक्षी | सरला बार्नबस | स. वा. मुळे |
| सिटी ऑफ जॉय | डॅमिनिक लॅपिए | अनिल कुलकर्णी |
| नॉट विदाऊट माय डॉटर | बेट्टी महमूदी | लीना सोहोनी |
| द टर्मिनल मॅन | मायकेल क्रिश्टन | अरुण मांडे |



सप्टेंबर १९९८

# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ वर्ष दुसरे
◆ अंक नववा


## अनुक्रम


संपादकीय ---------- २
बाबा पाटील : एक समर्थ कथालेखक ---------- ६
साहित्यवार्ता ---------- ८
पुस्तक परिचय ---------- १६
फुले आणि काटे ---------- ४०
नवीन स्पर्धा (१) ---------- ४४
वाचकांचा प्रतिसाद ---------- ४५
स्पर्धा निकाल ---------- ४६
नवीन स्पर्धा (२) ---------- ४७




**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे**
फोन : ४७६९२४

❑ कार्यकारी संपादक
शंकर सारडा
❑ संपादन सहाय्य
सुनीता दांडेकर
❑ मांडणी
मेहता पब्लिशिंग हाऊस

❑ अंकाची किंमत ५ रु.
वार्षिक वर्गणी ५० रु.
❑ वार्षिक वर्गणी मनीऑर्डरने पाठवावी.
❑ दरमहा १५ तारखेस हे मासिक प्रसिद्ध होईल.

*संपादक-मुद्रक-प्रकाशक :* **सुनील मेहता,** मेहता पब्लिशिंग हाऊस, १२१६, सदाशिव, पुणे - ३०.
*अक्षरजुळणी :* **मेहता पब्लिशिंग हाऊस,** १२१६, सदाशिव, पुणे - ३०. फॅक्स : २१२-४७५४६२
*या अंकातील लेखकांची मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*




**आनंदाचे अंतरंग** अनु.ः **फा. फ्रान्सिस दिब्रिटो**
कुणाचा देवावर विश्वास असो वा नसो पण मदरचा संदेश सर्वांना आकर्षित करतो. मदरच्या संदेशाने माणूस प्रेमानं वागण्याचा प्रयत्न करील. मदर तेरेसा यांनी विषद केलेला आनंदमय जीवनाचा संजीवक मंत्र.
मूल्य ः **पंच्याहत्तर रुपये**




**रंग सुखाचे□** **डॉ. रमा मराठे**
सुख म्हणजे काय? प्रत्येक माणसाच्या सुखाबद्दलच्या कल्पना, रंग वेगवेगळे असतात. हे विविध रंग लेखिकेने मानसशास्त्राच्या लोलकातून पाहिले आणि सहजतेने, साधेपणाने उपदेशकाचा आव न आणता शब्दबद्ध केले आहेत.
मूल्य ः **पासष्ठ रुपये**





**कोलाज** **शिरीष पै**
विविध रंगांच्या रचनेतून जी स्वतंत्र रचना तयार होते ती म्हणजे कोलाज. या लेखांचं स्वरुप वेगवेगळ्या अनुभवांना सामोरं जाणारं असं आहे. बहुविध भावना विचारांची विलोभनीय रचना कोलाजमध्ये झालेली आहे.
मूल्य ः **ऐंशी रुपये**




**कालिंदीच्या तीरावरती** **डॉ. य. दि. फडके**
ह्या कथा तीस बत्तीस वर्षापूर्वीच्या असूनही बाह्य वातावरणापेक्षा माणसाच्या अंतरंगाचा, मूलभूत जाणीवांच्या भावनांचा वेध घेणाऱ्या आहेत. त्यामुळेच त्या सार्वकालिक आहेत. डॉ. फडके यांच्या आशयघन कथांचा संग्रह.
मूल्य ः **पंच्याहत्तर रुपये**



**व्यवसाय मार्गदर्शक** अनु.ः **मीना किणीकर**
६५ व्यवसायांची शक्य तितकी अद्ययावत माहिती देण्याचा प्रयत्न या पुस्तकात केलेला आहे. त्यात त्या व्यवसायाचे स्वरूप, फायदे-तोटे आणि त्यासाठी आवश्यक गुण हे नेमकेपणाने सांगितले आहेत. पालक, विद्यार्थी यांना हे पुस्तक अत्यंत उपयुक्त ठरेल.
मूल्य ः **शंभर रुपये**




**भारत ः नेहरूंपासून नंदनवनापर्यंत**
अनु.ः **मधुकर तोरडमल**
या आपल्या नव्या आणि अभिनव ग्रंथात श्री. शशि थरूर यांनी भारताचे, भारतात खेळल्या जाणाऱ्या राजकारणाचे त्याच्या मानसिकतेचे आणि सांस्कृतिक संपन्नतेचे चित्रप्राय रुप साक्षात उभे केले आहे.
मूल्य ः **दोनशे रुपये**




**डिस्क्लोजर** अनु.ः **माधव कर्वे**
'डिस्क्लोजर' ही मायकेल क्रिश्टनची नवी कादंबरी. ह्या कादंबरीतून त्यानं माणूस नावाच्या प्राण्याच्या अथांग भावविश्वाचा वेध घेतला आहे. आजच्या एका बहुचर्चित अमेरिकन चित्रपटाची मूळ कथा.
मूल्य ः **दोनशेवीस रुपये**



**रोदँ** **शांताराम पारपिल्लेवार**
उत्कटतेनं रसरसलेला, आग्रही, बुद्धीनं प्रगल्भ असला, तरी तरल संवेदनशक्तीच्याच बळावर कृती करणारा मनस्वी शिल्पकार. युगप्रवर्तक फ्रेंच शिल्पकाराची मनोवेधक चरितकहाणी - रोदँ!
मूल्य ः **दोनशेनव्वद रुपये**

## विज्ञानविषयक संग्राह्य पुस्तके

| पुस्तक | लेखक |
|---|---|
| संशोधकाच्या यशोगाथा | शांता पेंडसे |
| प्राण्यांचे चित्रविचित्र जग | डॉ. अनिल महाबळ |
| यंत्रमानव व कृत्रिम बुद्धिमत्ता | निरंजन घाटे |
| असे शास्त्रज्ञ असे संशोधन | निरंजन घाटे |
| ज्ञानदीप | निरंजन घाटे |
| खेळ आणि विज्ञान | निरंजन घाटे |
| एकविसावं शतक | निरंजन घाटे |
| वैज्ञानिक खेळणी | डी. एस्. इटोकर |
| छंदातून विज्ञान | डी. एस्. इटोकर |
| विज्ञान गमती | डॉ. अरुण मांडे |
| विज्ञान जमती | डॉ. अरुण मांडे |
| विज्ञान विहार | नारायण धारप |
| पेशीबद्ध जीवन : एक निरंतर प्रवास | अनु. कविता भालेराव |
| शास्त्र-गंमत जत्रेत चौकस चिंगी | अनु. मीना किणीकर |
| प्रयोग करूया गमतीचे | अनु. मीना किणीकर |
| वनस्पती जीवाश्म | अनु. मीना किणीकर |
| संप्रेरकांची सुसंगती | अनु. मीना किणीकर |
| अज्ञात अनामिकांचे कर्तृत्व | अनु. वैशाली जोशी |
| किमया जनुकांची | अनु. वैशाली जोशी |
| माहितीचे महामार्ग | अनु. वैशाली जोशी |
| जनुक मोहीम | अनु. वैशाली जोशी |
| परिक्षानळीतील जंगले | अनु. प्रमोद जोगळेकर |
| हिरवे जनुक | अनु. प्रमोद जोगळेकर |
| जनुक शक्ती | अनु. प्रमोद जोगळेकर |
| विज्ञान, तंत्रज्ञान आणि प्रगती | नलगे / मुळीक |